# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक ०५ जुलै, २०१८ / आषाढ १४, १९४० ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण,क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३) पर्यावरण मंत्री** | |
| **(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५२**

---

### बुलढाणा, कोल्हापूर व नांदेड जिल्हयात बाटलीबंद अशुध्द पाण्याची विनापरवाना विक्री होत असल्याबाबत

**(१) * ११९४२३ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागात बहुतांश आरओ प्लाँट हे विना परवाना सुरु असून अशुध्द पाण्याचा पुरवठा करत असणे, कोल्हापूर जिल्हयात बोअरिंगचे पाणी शुध्द पाणी म्हणून विकणारे विनापरवाना कारखाने

सुरु असणे तसेच नांदेड जिल्ह्यात विनापरवाना अशुध्द बाटलीबंद पाणी विकून कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय करत असल्याचे दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार येथील बेकायदा आरओ प्लँटद्वारे विनापरवाना अशुध्द पाणी पुरवठा करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अशंत: खरे आहे.

(२) होय. नांदेड येथे बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करणाऱ्या पेढीवर कारवाई करण्यात आली असून पाण्याचा नमुना असुरक्षित आढळल्याने खटला दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा, हिंगोली व नांदेड जिल्ह्यात स्वस्त धान्याचा तसेच केरोसीनचा होत असलेला गैरव्यवहार

**(२) * ११८६८१ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभूर्णा (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून शासकीय गोदामात धान्य वाहतूक करणाऱ्या वाहनाला ६ कि.मी. अंतरावरील शासकीय गोदामात पोहचायला १ ते २ दिवसांचा कालावधी लागत असल्याचे तसेच प्रत्येक ट्रकमधून धान्य कमी येत असल्याची तक्रार दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास शासकीय गोदाम व्यवस्थापकांनी तहसीलदारांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा तहसील कार्यालयांतर्गत वितरण अधिकारी वर्गाच्या दुर्लक्षामुळे ऑनलाईन ३१ हजार शिधापत्रीका धारकांपैकी केवळ १६ हजार शिधापत्रीका धारकांना धान्य मिळत असून १५ हजार शिधापत्रीका धारकांना धान्य न देता काळाबाजार करत असल्याचे दिनांक ०५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश मंत्रालयीन स्तरावरुन माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच औढा (जि.हिंगोली) व नायगाव (जि.नांदेड) तालुक्यात केरोसिनचा काळाबाजार होत असून जवळा बाजार येथील अर्ध घाऊक विक्रेता किरकोळ परवानाधारकांना अर्धाच कोटा वितरीत करीत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, खामगांव येथे रेशनचे धान्य आणि हिंगोली व नांदेड येथील केरोसीन स्वस्त धान्य दुकानदारांना वितरित न करता रेशन माफियांमार्फत काळया बाजारात विकून होत असलेला गैरव्यवहार तसेच पुरवठा वाहतूक कंत्राट करार रद्द करणे इत्यादींबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, बुलढाणा तालुक्यात एकूण ४३,२७३ शिधापत्रिकाधारकांना ई-पॉझ मशीनद्वारे धान्य वाटप करण्यात येते, शिधापत्रिकाधारकांचे धान्य काळ्या बाजारात विक्री होत असल्याबाबतची बाब निदर्शनास आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

(४) औंढा, (जि. हिंगोली) तसेच नायगांव खै. (जि. नांदेड) या तालुक्यांमध्ये मे, २०१८ वा त्यादरम्यान अर्ध घाऊक विक्रेत्यांकडून किरकोळ केरोसिन परवानाधारकांना अर्धा कोटा वितरीत करीत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) खामगाव येथे अन्नधान्याच्या वाहतुकीदरम्यान अन्य प्रकरणी पकडलेल्या वाहनासंदर्भात पोलीस स्टेशन खामगाव येथे गुन्हा नोदविण्यात आला असून पोलिस तपास सुरु आहे. तर, वाहतूक कंत्राटदारासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने उपायुक्त, पुरवठा औरंगाबाद यांना चौकशी करण्याच्या सूचना दिल्या असून चौकशी अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही. त्याचप्रमाणे औंढा, जि.हिंगोली व नायगांव, जि.नांदेड येथे केरोसिन माफीयांमार्फत काळ्या बाजारात केरोसिन विकले गेल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील उत्तम गुणवत्ता प्राप्त करणा-या महाविद्यालयांना वित्तीय स्वायत्तता देण्याबाबत

**(३) * १२०२४९ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठावरील परीक्षांचे ओझे कमी करण्याबरोबरच शासनाचा आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्यातील उत्तम गुणवत्ता प्राप्त करणा-या महाविद्यालयांना वित्तीय स्वायत्तता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्तीय स्वायत्तता बहाल केल्या जाणा-या महाविद्यालयांना शैक्षणिक शुल्क आकारणी, शिक्षण व शिक्षकेतर पदे भरणे, परीक्षा घेणे इत्यादी अधिकार मिळणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर्थिकदृष्ट्या मागास असणाऱ्या विद्यार्थ्यांना इच्छा असूनही उच्च शिक्षण घेता येणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांना करावी लागणारी अशैक्षणिक कामे

**(४) * ११७९८४ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, शिक्षकांना सर्व शिक्षा व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान हे दोन्ही आणि शिक्षण प्रशिक्षण योजनांचे एकत्रीकरण करुन राबविण्यात येणाऱ्या 'समग्र शिक्षा अभियानाची सुरुवात पूर्व प्राथमिक ते १२ वीच्या वर्गापर्यंत नेण्याचा निर्णय केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने घेतल्याने या योजनेसाठी पूर्व प्राथमिक ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांशी निगडित असलेली ४४ मुद्यांची माहिती दोन दिवसात सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी स्टूडंट डेटाबेस मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टम (एसडीएमआयएस) ही नवीन प्रणाली विकसित करण्यात आली असून उक्त माहिती दिनांक १८ एप्रिल, २०१८ पर्यंत ऑनलाईन भरुन दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी मुख्याध्यापकांची सभा व दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी शिक्षण उप संचालकांनी भरलेल्या माहितीचा आढावा घेणे असा कार्यक्रम ठरविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मुंबईसह राज्यातील शिक्षकांना मतदार संघातील ओळखपत्राचे वाटप करणे, दिव्यांग मतदारांचा शोध घेणे यासह इतर बीएलओची कामे तसेच इतरत्र अनेक अशैक्षणिक कामे लादली जात असून शाळांमधील शिक्षकांना पेपर तपासणी, निकाल, दहावी पुनर्रचित अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण ही कामे सुरु असतानाच शासनाने समग्र शिक्षा अभियान योजनेसाठी ऑनलाइन माहिती भरुन देण्याचा आदेश काढला असल्याने संतप्त शिक्षकांनी ऑनलाईन माहिती भरण्यासाठी प्रत्येक शाळेत स्वतंत्र संगणक ऑपरेटर नेमावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक परिषदेने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रक्रियेतील माहिती ही यापूर्वी सरल प्रणालीत भरण्यात आली त्याच माहितीचा उपयोग समग्र शिक्षा अभियानासाठी करावा अशी सूचना शिक्षकांनी शिक्षण विभागास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच शाळाबाह्य ऑनलाईन कामाचा ताण, शाळेचा निकाल लावण्याची कालमर्यादा गाठतांना मानसिक संतुलन ढासळल्याने चांदवड तालुक्यातील मेसनखेड खुर्द शाळेत कार्यरत असलेल्या श्री.मुकुंद मनोहरदास शोभावंत या ५४ वर्षीय मुख्याध्यापकाने दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास गळफास घेवून आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे का आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त झाले नाही.

(४) अशा प्रकारची सूचना शासनास प्राप्त नाही. तथापि सरल प्रणालीमध्ये असलेली १४ बाबींची विद्यार्थीनिहाय माहिती स्टुडंट डेटाबेस मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टम (एसडीएमआयएस) मध्ये पोर्ट करण्यात आलेली असून उर्वरित ३० प्रकारची माहिती शाळांनी भरणे आवश्यक आहे.

(५) प्रशासकीय कामकाजाच्या ताणामुळे आत्महत्या केली हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुर्यलक्ष्मी कॉटन मिल, नगरधन, एनटीपीसी व इतर कंपन्याचे (ता.रामटेक, जि.नागपूर) केमिकलयुक्त व राखमिश्रीत पाणी कन्हान नदीत सोडल्याने प्रदुषण झाल्याबाबत

**(५) * १२१७७० श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुर्यलक्ष्मी कॉटन मिल, नगरधन, एनटीपीसी व इतर कंपन्यांचे (ता.रामटेक, जि.नागपूर) केमिकलयुक्त व राखमिश्रीत पाणी कन्हान नदीत सोडण्यात येत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या तसेच इतर सजिवांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

तथापी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नागपुर येथील प्रादेशिक कार्यालयास दि. ८/३/२०१८ रोजी नगरपंचायत मौदा यांच्या मार्फत कन्हान नदीचे पाणी दुषीत झाल्याबाबत पत्र प्राप्त झाले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने दि. २१/३/२०१८ रोजी सदर तक्रार स्थळाला भेट देऊन तसेच सदर परिसरातील इतर उद्योगांना भेट दिली असता उद्योगांमार्फत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या नदीमध्ये औद्योगिक सांडपाणी अथवा घरगुती सांडपाणी सोडत असल्याचे निदर्शनास आले नाही. पंरतु नगरपंचायत मौदा यांच्या हद्दीतील घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नदीपात्रात सोडत असल्याचे निदर्शनास आले.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) नगरपंचायत मौदा यांचे घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया नदीमध्ये सोडत असल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नगरपंचायतीस दि. २५/४/२०१८ रोजी पत्र देण्यात आले असून दि. २१/६/२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील ऑनलाईन मुल्यांकन प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(६) * ११७४१३ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली),**

**श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या विधी शाखेच्या प्रलंबित असलेल्या निकालांपैकी तीन विषयांचे निकाल दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास जाहीर झाले असून प्रॅक्टिकल परीक्षेत अनेक विद्यार्थी नापास झाले असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच एलएलएमच्या सत्र ३ मध्ये प्रत्येकी १०० गुणांचे दोन लेखी पेपर व १०० गुणांची प्रॅक्टिकल परीक्षा असते त्यामुळे हयुमन राईट्स लॉ या ग्रुपमधुन ७६ विदयार्थी परिक्षेला बसले होते त्यापैकी २२ विदयार्थ्यांना प्रॅक्टिकल परिक्षेत १०० पैकी ५० पेक्षाही कमी गुण मिळाल्याने उक्त विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊन त्यांच्यावर नापास होण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षेची अनियमितता कायम असून प्रलंबित असलेल्या निकालांमुळे विधी अभ्यासक्रमाची परीक्षा पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आल्याचे तर विधी विभागातील पदव्युत्तर पदवीच्या सात बहुपर्यायी प्रश्न उत्तरांसह छापल्याची चूक कबुल करणाऱ्या पेपर सेटरवर विद्यापीठाने कोणतीही कारवाई केली नसल्याचे तसेच मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा नियंत्रकांवर कारवाई करुन परिक्षेचे निकाल वेळेत लावण्यासंदर्भात विद्यार्थी संघटनांनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.राज्यपाल व मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचेकडे तक्रारी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मुंबई विद्यापीठातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमातील ३० परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला असून गतवर्षी प्रमाणे यावर्षीही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सत्र धोक्यात येणार असल्याचे तसेच सातत्याने बदलणाऱ्या वेळापत्रकामुळे पुढील वर्षाच्या वेळापत्रकावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे तर निकाल हा खूपच कमी असून विद्यापीठाने नैतिक जबाबदारी स्वीकारुन पुनर्मुल्यांकन करावे आणि विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबतची मागणी विद्यार्थी संघटनेने विद्यापीठाकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई विद्यापीठातील ऑनलाईन मुल्यांकन प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकाराची  चौकशी करण्यासाठी शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

निकाल उशीरा लागल्यामुळे नापास विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरता यावे व परीक्षा देता यावी याकरीता प्रलंबित असलेल्या निकालांमुळे विधी अभ्यासक्रमाची परीक्षा पुढे ढकलण्यात येते.

विधी विभागातील पदव्युत्तर पदवीच्या सात बहुपर्यायी प्रश्न उत्तरांसह छापल्याची चूक  कबुल करणाऱ्या पेपर सेटरला विद्यापीठाच्या दि. १५/०९/२०१७ च्या पत्रान्वये "भविष्यात अश्याप्रकारच्या चुका पुन्हा होणार नाहीत याची सर्वतोपरी काळजी घेण्यात यावी"  अशी सक्त ताकीद देण्यात आली आहे.

तसेच मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा नियंत्रकांवर कारवाई करुन परिक्षेचे निकाल वेळेत लावण्यासंदर्भात विद्यार्थी संघटनांनी केलेल्या तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत.

(४) अंशत: खरे आहे.

(५) उपरोक्त प्रकरणी गैरप्रकाराची चौकशी करण्याकरीता प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झाला नाही.
(६) लागू नाही.

-----------------

## राज्यात प्लास्टिक बंदीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(७) * ११६६२६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नारायण पाटील (करमाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर),**

**श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्लास्टिक वापरामुळे निसर्गाचे होणारे नुकसान व भविष्यात पर्यावरणाचे संवर्धन होण्याच्यादृष्टीने पर्याय उपलब्ध करुन न देता प्लास्टिक बंदीचा निर्णय जाहीर केला परंतु त्याची अंमलबजावणी करण्याकरिता पुरेशी यंत्रणा नसल्याने सामान्य जनता व व्यावसायिक यांच्यामध्ये संभ्रमावस्था निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यातील वाळूज रेल्वेस्टेशन, चिकलठाणा, पैठण इ. औदयोगिक वसाहतीमधील अनेक कंपन्यामध्ये प्लास्टिक बंदी असूनही थर्माकोलचे उत्पादन सुरुच असल्याचे प्रदुषण नियंत्रण मंडळाने केलेल्या तपासणीमध्ये निदर्शनास आल्याने येथील ७ कंपन्यांना नोटीस दिली असून त्यात थर्माकोल कंपनीचाही समावेश असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने माहे मार्च, २०१८ पासून प्लास्टीक बंदी लागू केल्याने २ हजार ५०० प्लास्टीक पिशव्या उत्पादकांचा व्यवसाय बंद होवून ५६ हजार नोंदणीकृत कामगार बेरोजगार झाल्याने प्लास्टीक उत्पादक उद्योजकांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री तसेच मा.पर्यावरण मंत्री यांना त्यांच्या मागण्यांचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ५० मायक्रॉनहून कमी जाडीच्या प्लॅस्टिकच्या पिशव्यांचे उत्पादन करणाऱ्या व्यावसायीकांवर कारवाई केल्याच्या विरोधात मा.न्यायालयाने प्लॅस्टिक बंदी योग्य ठरवून उत्पादकांना ३ महिन्यात प्लॅस्टिक उत्पादनाची विल्हेवाट लावण्याची मुदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्लास्टिकचे उत्पादन, वापर व नष्ट करण्यासंदर्भात तसेच प्लास्टिकला पर्याय शोधण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास सचिवांची एक समिती नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर समितीची रचना व कार्यकक्षा काय आहेत, समिती किती कालावधीत आपला अहवाल सादर करणार आहे तसेच प्लॅस्टिकच्या पिशव्यांचे समुळ उच्चाटन करण्याची योजना "प्लॅस्टिक बॅग मॅन्युफॅक्चरर्स असोशिएशन ऑफ इंडियाने" (पाबीएमएआय) मा.मुख्यमंत्री, मा.पर्यावरण मंत्री आणि मा.उद्योग मंत्री यांना सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, प्लास्टिक बंदीनंतर जमा होणाऱ्या प्लास्टिक बाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे तसेच प्लास्टिक बंदीमुळे बेरोजगार झालेले कामगार व प्लास्टिकला पर्याय उपलब्ध करुन देणे इत्यादींबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) होय. औरंगाबाद जिल्यातील वाळुंज रेल्वे स्थानक, चिखलठाणा, पैठण इत्यादी औद्योगिक वसाहती मधील प्लास्टिक व थर्माकॉल उत्पादन घेत असलेल्या १० उद्योगांना प्रस्तावित निर्देश बजाविण्यात आले आहेत.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

(५) दिनांक २२.३.२०१८ तसेच दिनांक १०.०४.२०१८ च्या शासन निर्णयांन्वये प्लास्टिक थर्माकॉल पासून बनविण्यात येणा-या उत्पादनांवर बंदी संदर्भात मा.मंत्री पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती गठित करण्यात आली आहे.

(६) सदर शक्ती प्रदत्त समितीमध्ये मा.मंत्री (वित्त)/उच्च व तंत्र शिक्षण/उद्योग/कामगार तसेच मा.राज्यमंत्री (पर्यावरण), अपर मुख्य सचिव (पर्यावरण), मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग) सचिव (लघु व मध्यम उद्योग) तथा विकास आयुक्त (उद्योग) सदस्य सचिव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, आयुक्त विक्रीकर, संचालक (पर्यावरण) सदस्य आहेत.

सदर समिती प्लास्टिक व थर्माकॉल उत्पादनांवर बंदी आणण्यासंदर्भात प्रस्तावित प्रारुप नियमामध्ये सुधारणा करुन अंतिम करणे व या नियमानामध्ये भविष्यामध्ये आवश्यकती सुधारणा करणे व अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन वेळोवेळी निर्णय घेईल.

(७) सदर अधिसुचनेनुसार जमा होणा-या प्लास्टिकच्या विल्हेवाटीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत अंतर्भूत केलेला आहे.

उत्पादक, विक्रेते, किरकोळ, व्यापारी, वितरक, वापरकर्ते (अधिसूचनेप्रमाणे लागू) यांनी उपलब्ध साठयाची विल्हेवाट

१. राज्याच्या क्षेत्राबाहेर विक्री

२. प्राधिकृत पुर्नचक्रण करणा-या घटकास विक्री

३. स्थानिक स्वराज्य संस्थेकडे शास्त्रीय विल्हेवाठीसाठी किंवा पुर्नचक्रणासाठी हस्तांतरण करण अधिसूचनेच्या दिनांकापासून अशा प्रकारे तीन महिन्याच्या आत करावी.

तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अस्तित्वातील बंदीत प्लास्टिक वस्तुंचा घटकाच्या साठयाचे किंवा त्यापासून निर्माण होणा-या कच-याचे संकलन, वाहतूक व्यवस्था करुन ती प्राधिकृत पुर्नच्रकण करणा-या घटकास किंवा शास्त्रीय विल्हेवाटीसाठी व्यवस्था निर्माण करावी. हयासाठी अधिसूचनेच्या दिनांकापासून तीन महिन्यांची मुदत देण्यात आलेली आहे.

सदरची बंदी अधिसूचनेनुसार दिनांक २३ मार्च, २०१८ पासून लागू करण्यात आली आहे. प्लास्टिकला पर्यावरण पुरक पर्याय उपलब्ध असून तसेच प्लास्टिक बंदीमुळे बेरोजगार झालेल्या कामगारांबाबत कामगार विभागाकडून माहिती घेण्यात येऊन त्याबाबत पुढील आवश्यकती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औदयोगिक वसाहतीतील कपंन्यांचे सांडपाणी नाल्यामध्ये मिसळून बंधाऱ्याचे पाणी दूषित होत असल्याबाबत**

**(८) * ११६५८७ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औदयोगिक वसाहतीतील रासायनिक सांडपाणी मौजे घाणेखुंट गावातील नाल्यामध्ये मिसळल्याने बंधाऱ्याचे पाणी दूषित झाल्याचे दिनांक २४ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असल्याने संतप्त ग्रामस्थांनी सीईटीपी कार्यालयावर माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औदयोगिक वसाहतीतील रासायनिक कचरा, घनगाळ हा तळोजा येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट येथे पाठविण्याचे निदेश असताना दुर्गा केमिकल्स या कंपनीतील ठेकेदाराने मौजे आवाशी-भेंडेवाडी येथील मार्गावरील मानवी वस्तीत टाकल्याने उक्त रासायनिक कचरा खाल्ल्याने मौजे गुणदे-तलारीवाडी येथील एका शेतकऱ्याची म्हैस मृत झाल्याचे माहे मे, २०१८ दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्यांना २५० सीओडी उत्सर्गाची मर्यादा असतांनाही त्याचे उल्लंघन करून सुमारे १ लाख सीओडी उत्सर्ग होत असल्यामुळे या परिसरातील नागरिकांना उग्र वासाने श्वास घेण्यात त्रास होत असने, प्रदूषित

पाणी लगतच्या शेतजमिनींमध्ये जाऊन शेतीचेही नुकसान होत असल्याने, सदर औद्योगिक विकास महामंडळातील प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांबाबत पर्यावरण प्रेमींनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केलेल्या तक्रारीची दखल न घेणे तसेच सदर कारखान्यांवर कारवाई न केल्यास दिनांक १९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रदूषण महामंडळ कार्यालयामध्ये आत्मदहन करण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रीय समितीकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी सदर कारखान्याची पहाणी केली असता गुजरातच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाने केंद्र शासनाला पाठविलेल्या अहवालात कोणत्या बाबी नमूद केल्या आहेत, त्यानुषंगाने संबंधित कारखान्यांवर कोणती कारवाई केली तसेच प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करुन संबंधित कंपनी, ठेकेदार आणि रासायनिक घनकचरा मानवी वस्तीत टाकणाऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे अंशत खरे आहे.

(४) केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली यांनी दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी मे.श्रेयस इटंरमिडीएट या कारखान्याची पाहणी करून या कारखान्यांला दिनांक ११/०६/२०१८ रोजी नोटीस बजावली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) ग्रामीण भागातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(९) * ११८०४३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) मधील ग्रामीण भागातील पाणी टंचाई दूर करण्यासंदर्भात मुख्यमंत्री नळपाणी योजना टप्पा क्र.२ मधून भिवंडी पूर्व या मतदार संघातील गाव-पाडयांची कामे तातडीने करणेबाबत मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात गतवर्षी १९ टँकरने पाणीपुरवठा केला होता तथापि त्या देयकाचे ७५ लाख ठेकेदाराला न मिळाल्याने त्यांनी पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या २८ गावे ८८ पाड्यांमध्ये पाणी टंचाई असतांना उप अभियंता सतत गैरहजर राहत असल्याने पाणी टंचाईबाबत उपाययोजना न केल्यास श्रमजीवी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला असल्याने भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी ग्रामसेवक व पाणी पुरवठा अधिकाऱ्यांसमवेत पाणी टंचाईबाबत दिनांक २९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या आढावा बैठकीत पाणी टंचाई दूर करण्याकरिता कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या सर्वेक्षणानुसार किती गावपाडयांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली आहे तसेच त्यांना तातडीने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) भिवंडी तालुक्यात कोठेही पाणी टंचाई नाही. उप अभियंता यांच्याकडे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, ठाणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता.

श्रमजिवी संघटनेने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी व उप अभियंता, पाणी पुरवठा उप विभाग, भिवंडी यांनी दिनांक २९ एप्रिल, २०१८ रोजी पाणी टंचाईबाबत ग्रामसेवकांच्या आढावा बैठकीत

तातडीच्या उपाययोजना करण्याकरिता आस्तित्वातील पिण्याच्या पाण्याची साधने कार्यान्वित ठेवणे व तसेच विंधण विहिर घेणे, लघु नळ पाणी पुरवठा योजना घेणे याबाबत सूचना दिल्या आहेत.

संभाव्य टंचाईगस्त गाव-पाडयांमध्ये आवश्यकतेनुसार १४ वा वित्त आयोग व पेसा अंतर्गत १५ ठिकाणी लघु नळ पाणी पुरवठा योजना व ९१ ठिकाणी विंधनविहीरी घेण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारसी कॉलनी, दादर (मुंबई) येथील मुंबई विद्यापीठाच्या मालकीचा भूखंड खाजगी विकासकाला देवून केलेला गैरव्यवहार

**(१०) * ११८७५२ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील पारसी कॉलनी येथील मुंबई विद्यापीठाच्या मालकीचा असलेला एक भूखंड विद्यापीठ प्रशासनाने सन २००६ मध्ये एका खाजगी विकासकाला कोणत्याही प्राधिकरणाची परवानगी न घेता विकासाकरीता देऊन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याने त्याची चौकशी करावी अशी लेखी मागणी युवा सेनेच्या सिनेट सदस्यांनी पत्राद्वारे मा.राज्यमंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांच्याकडे केली असल्याचे दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिनेट सदस्यांनी दिलेल्या लेखी निवेदनातील प्रमुख मागण्या कोणत्या आहेत,

(३) तसेच, उपरोक्त जागेत बाहेरुन येणा-या विदयार्थ्यांसाठी गेस्ट हाऊस बांधणे प्रस्तावित होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
या संदर्भात युवा सेनेच्या सिनेट सदस्यांनी दि.२१.०४.२०१८ रोजी निवेदन दिले आहे.
(२) सिनेट सदस्यांनी मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांना दिलेल्या निवेदनात प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेतः-

१. विकासकांनी मुंबई विद्यापीठास किती जागा दिली.

२. या जागेचा काय उपयोग केला जात आहे.

३. त्याच्या वापराबाबत विद्यापीठांस काही भाडे किंवा निधी दिला जात आहे का.

४. याबाबत सखोल चौकशी करण्यात येऊन दोषीवर कार्यवाही करण्यात यावी.

(३) हे खरे नाही.

श्रीमती सौदामिनी पंतवैद्य यांनी दि.०७.०५.१९७८ रोजी केलेल्या दुसऱ्या व अंतिम मुत्यूपत्राच्या पुरवणीतील (Second Codicil Will) मधील कलम क्र.४ अन्वये मुंबई विद्यापीठांस सदर Property साठी स्कीम तयार करण्यासाठी सुचीत करण्यात आले आहे.

(४) याबाबत मानद विधी सल्लागार मुंबई विद्यापीठ यांचा सल्ला घेण्यात येत असून त्यांच्या सल्ल्यानुसार पुढील कार्यवाही विद्यापीठ स्तरावर करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वारणा धरणाच्या लाभक्षेत्रातील गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(११) * ११८३२९ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर व सांगली जिल्हयातील वारणा धरणाच्या लाभक्षेत्रातील अनेक गावांना अद्यापही पुरेसा पाणीपुरवठा करण्यात येत नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील ११९ गावे अदयापी पाणीटंचाईग्रस्त असून जिल्ह्यातील गावांना शुध्द पाण्याचा नियमित पुरवठा करणे, गावातील पुढील दहा वर्षाची लोकसंख्या गृहीत धरुन रुपये २२२ कोटी रुपयांचा दोन प्रादेशिक नळ-पाणीपुरवठा योजनांच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तयार केलेल्या प्रस्तावास विकास प्राधिकरणाने अद्याप मान्यता दिली नसणे तसेच राधानगरी, भुदरगड, आजरा, शाहूवाडी, कागल, पन्हाळा अशा एकूण २० पाणी पुरवठा योजनेची कामे निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील सबंधित गावांना पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने प्रलंबित पाणी पुरवठा योजनांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) कोल्हापुर जिल्हयामध्ये सन २०१७-१८ च्या उन्हाळयात ३७ गावे/वाडया टंचाईग्रस्त आढळून आल्याने २९ विंधण विहीरी व ८ खाजगी विहीरी / विंधन विहीरी अधिग्रहण करुन पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

कोल्हापुर शहरालगतच्या गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी दूधगंगा नदी उद्भव घेऊन रु. २२०.०० कोटी किंमतीची एक प्रादेशिक योजना प्रस्तावित करण्यात आली होती. परंतु, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या दिनांक २५/५/२०१८ रोजीच्या सभेत एक प्रादेशिक योजनेऐवजी पाचगाव व इतर ३ गांवे स्वतंत्र प्रादेशिक योजना व प्रादेशिक उंचगाव व इतर ७ गांवे स्वतंत्र प्रादेशिक योजना तयार करावी असे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. सदर योजनांबाबत जिल्हा परिषद, कोल्हापुरच्या सर्वसाधारण सभेचा ठराव होण्यासाठी शिफारस करण्यात आली आहे. तसेच, मौ.कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर या गावासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत योजना राबविण्यात येत असून, ती पुर्णत्वाच्या टप्प्यावर आहे.

राधानगरी, भुदरगड, आजरा, शाहुवाडी, कागल व पन्हाळा अशा एकूण २० योजनांची कामे निधी अभावी प्रलंबित नाहीत.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, कोल्हापूर यांनी नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रातील एकूण १६ गावांसाठी दुधगंगा नदी उद्भव घेऊन दर दिवशी दरडोई १३५ लिटर पाण्याचे प्रमाण गृहीत धरुन योजनेचा प्रस्ताव नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर यांचे मार्फत शासनास सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.

सांगली जिल्हयातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत नळ पाणी पुरवठा योजना पुर्ण करण्यासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. २९.०४ कोटी व सन २०१७-१८ मध्ये रु. ३१.८९ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सांगली जिल्हयातील निधी अभावी एकही योजनेचे काम बंद नाही.

कोल्हापूर जिल्हयातील सन २०१७-१८ च्या कृती आराखडयातील एकणू ५८ योजना प्रगतीपथावर असून, त्यासाठी एकूण ३७.४३ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर निधी ग्राम पंचायतीकडे वर्ग करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरेगाव (जि.सातारा) येथील आयनॉक्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी या विद्यापीठाविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(१२) * ११७२४६ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम**

**(दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव (जि.सातारा) येथे आयनॉक्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी नावाने ऑनलाईन बोगस विद्यापीठ स्थापन करुन पीएचडी व मानद पीएच.डी. तसेच डी. लिट पासून हवी ती पदवी देण्यात येत असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठाचे तथाकथित कुलपती डॉ.विठ्ठल श्रीरंग मदणे यांनी कोणत्याही विषयातील पदवी ते पीएचडी पर्यंतची पदवी किमान ५० हजार रुपायांस विक्री करुन कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला असल्याने कुलपतीला पोलिसांनी पकडल्याचे दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर या शहरांमध्ये युजीसीची मान्यता न घेता, अभिमत असल्याचा दावा करणारी आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाची मान्यता नसणारी एकूण १३ बोगस विद्यापीठे कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

एकूण ६ बोगस विद्यापीठाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून, पुरंदर विद्यापीठ, सासवड, पुणे या विद्यापीठाबाबत विधी व न्याय विभाग २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२० नुसार कारवाई सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या खाद्य व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * ११८२५९ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निम्मे खाद्य व्यावसायिक विनापरवाना व्यवसाय करत असून परवाना व नोंदणीशिवाय सुरु असलेल्या या व्यावसायिकांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने तसेच कागदपत्रांची पडताळणी न करताच त्यांना परवाने दिले जात असल्याने महालेखापालांनी अन्न व औषध प्रशासनावर आक्षेप घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात १६.८६ लाख व्यावसायिकांपैकी केवळ ९.४३ लाख खाद्य व्यावसायिकांनी जून २०१६ पर्यंत नोंदणी केली असून उर्वरीत ७.४३ लाख खाद्य व्यावसायिक नोंदणी आणि परवान्यांशिवाय व्यवसाय करत असल्याचे महालेखापालांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर तसेच विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या खाद्य व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

सन २०१८ मार्च अखेर पर्यंत प्रशासनाकडे ९.१२ लाख नोंदणी/परवाने देण्यात आलेले आहेत. विनापरवाना/विनानोंदणी अन्न व्यवसायिकांवर प्रशासनाकडून वेळोवळी कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडवली (जि.ठाणे) येथील जे.के.एस. कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना थेट टिवायबीएसस्सी मध्ये प्रवेश दिल्याबाबत

**(१४) * ११७१२१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या खडवली (जि.ठाणे) येथील, जे.के.एस. कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स मध्ये साडेचार लाख रुपये घेऊन थेट टिवायबीएसस्सी मध्ये २५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याबाबतच्या तक्रारी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, सचिव, संचालक व मुंबई विद्यापीठ यांचेकडे आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरप्रकार विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील कर्मचाऱ्यांच्या संगनमताने केला असून विद्यार्थ्याकडून पैसे घेतल्यानंतर त्यांना प्रथम आणि व्दितीय वर्षाला प्रवेश न देता बीएस्सीच्या अखेरच्या वर्षात प्रवेश दिले जात होते तसेच ह्या विद्यार्थ्यांना प्रथम आणि व्दितीय वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या बनावट गुणपत्रिका सुद्धा तयार करून देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी, नेमलेल्या समितीने शासनास दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास सादर केलेल्या अहवालाद्वारे उक्त बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. या संदर्भात कुलगुरु यांनी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार थेट टि.वाय.बी.एस्सी मध्ये २५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला ही बाब पूर्णपणे खरी नसुन समितीच्या निष्कर्षानुसार १ लाख ४० हजार रुपयाचा देवाण घेवाण झाल्याचा उल्लेख आहे. तसेच या संदर्भात कोणतीही तक्रार आली नसुन विद्यापीठाच्या परिक्षा विभागाने कागदपत्रे तपासणी दरम्यान निदर्शनास आलेली बाब आहे.
(२) अंशत: खरे आहे.

यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठातील हंगामी कर्मचारी व MKCLया एजन्सीचा एक कर्मचारी यांचा संबंध असल्याचे आढळून आले असून थेट बी.एस्सी च्या अखेरच्या वर्षात प्रवेश दिल्याची बाब खरी नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी शासनस्तरावरुन कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, तथापि विद्यापीठाने स्थापन केलेल्या चौकशी समितीचा अहवाल विद्यापीठाने परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. सदर बैठकीत पुढील ठराव पारित करण्यात आले आहेत

१. सदर महाविद्यालयाच्या परिक्षेतील अनियमितते संबंधीची बाब विद्वत परिषदपुढे ठेवण्यात यावी.

२. प्रवेशासंदर्भात MKCL च्या अधिकाऱ्यांचे महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांशी कोणताही संबंध येवू नये.

३. PRN संबंधी व्यवहार विद्यापीठाचे उपकुलसचिव आणि सहाय्यक कुलसचिव यांच्या लेखी नोंदीशिवाय होऊ नये.

४. MKCL ने संबंधीत विभागाच्या लिखित आदेशाशिवय कुठलेही कार्यवाही करु नये.

सदर ठराव परिक्षा व मूल्यमापन मंडळाच्या पुढील बैठकीत मंजूर झाल्यानंतर सदर बाब विद्यापीठाच्या विद्वत परिषदेपुढे ठेवण्यात येईल.

(५) लागू नाही.

-----------------

## गोदावरी नदी पात्रात (जि.नाशिक) औद्योगिक क्षेत्रातील दूषित पाण्यामुळे होत असलेले प्रदुषण

**(१५) * ११७८४७ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदी पात्रात (जि.नाशिक) वाहून येणारी पानवेली आणि नाशिक शहरासह परिसरातील औद्योगिक क्षेत्रातून नदीपात्रात मिसळणारे दुषित पाण्यामुळे नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्यात येणाऱ्या देश-विदेशातील पक्ष्यांचा अधिवास धोक्यात आल्याचे तसेच निफाड तालुक्यातील गोदाकाठ भागातील अनेक गावांना साथीचे रोग आणि शेतीत क्षारयुक्त पाणी मिसळत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुकणे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) धरणात रसायन मिश्रित पाणी सोडले जात असल्याने धरणातील मासे मृत होत असून दुषित पाण्यामुळे नदी परिसरातील गावांना आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी उप प्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचेकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यात उन्हाळ्यात नागरिक तसेच इतर सजीवांच्या पिण्याच्या पाण्यासह आरोग्याच्या भीषण समस्या निर्माण होत असल्याने प्रदुषण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करुन गोदावरी नदी प्रदुषणमुक्त करणे तसेच इगतपूरी येथील मुकणे गावातील ग्रामस्थांच्या तक्रारी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) व डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्या प्रकिया न करताच सांडपाणी सोडत असल्याने होत असलेले प्रदुषण

**(१६) * १२१३७८ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतींतील ९९५ कारखान्यांपैकी ३३० कारखान्यातून प्रक्रिया न करता सांडपाणी सोडत असल्याने कारखाने बंद करणे तसेच सांडपाणी शुध्दिकरण प्रकल्पाकडून (सीईटीपी) पाच कोटी रुपयांचा दंड आकारण्याचे आदेश दिल्ली येथील राष्ट्रीय हरितलवादाने दिले असणे, डोंबिवलीतील रसायनिक कंपन्यातील सांडपाणी प्रक्रिया न करताच खाडीत सोडले जात असणे तसेच खोपटे (ता.उरण) ग्रामपंचायत हद्दीतील बांधपाडा हद्दीत खाजगी कंपनीतील कचरा बेकायदेशीरपणे समुद्र किनाऱ्यावर टाकून जाळण्यात येणे व खाजगी कंपनीतील खराब मालाचे कंटेनर रिकामे केल्याने नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होऊन संसर्ग झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतील कंपन्यांकडून प्रदूषण होत असल्याच्या अनेक तक्रारी शासनास प्राप्त झाल्या असून काही कंपन्यांना दंडही लावण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) तळोजा येथील औद्योगिक वसाहतीत कारखान्यांतून प्रक्रिया न करता सांडपाणी सोडण्यात येत आहे हे खरे आहे. राष्ट्रीय हरित लवादाने दंडास सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. परंतु डोंबिवलीतील रासायनिक कारखान्यांतील सांडपाणी त्यांच्या कारखांन्यामध्ये असलेल्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्राथमिक प्रक्रिया केल्यानंतर पुढील प्रक्रियाकरिता सामुहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये सोडण्यात येते. सदर ठिकाणी पुनश्च प्रक्रिया केल्यानंतर सांडपाणी खाडीमध्ये सोडण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांनी बसविलेल्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची वेळोवेळी पाहणी व तपासणी करण्यात येते. पाहणी दरम्यान दोषी आढळल्यास उद्योगावर योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेला शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अनुदान देण्याबाबत

**(१७) * ११७१५७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील**

**(एरंडोल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायदा लागू होऊन ८ वर्षाचा कालावधी होवूनही त्याच्या अंमलबजावणीसाठी निधी नसल्यामुळे पाचव्या व सहाव्या वेतन आयोगानुसार सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षापासून ते सन २०१६-१७ या वर्षापर्यंतचे रुपये २ हजार १८८ कोटी पेक्षा अधिक वेतन अनुदान शासनाने महापालिकेलादिले नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडे सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षापासून ते सन २०१६-१७ या वर्षापर्यंतचे रुपये २ हजार १८८ कोटी पेक्षा अधिक वेतन अनुदान थकीत असल्याने मुंबई महानगपालिकेला चौथ्या आयोगानुसार वेतन दयावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले त्यानुसार उक्त थकित अनुदान महापालिकेला अदा करण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय, दिनांक ७ जुलै, २०१५ अन्वये महानगरपालिका व नगरपालिकांना प्राथमिक शिक्षणावरील खर्चासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात येणा-या अनुदानाबाबतचे सूत्र विहित करण्यात आले आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेला अनुदान वितरीत करण्यात येते. सन २०१७-२०१८ पर्यत मुंबई महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील आधारकार्ड लिंक नसलेल्या शिधापत्रिका धारकांना धान्य देण्याबाबत

**(१८) * ११६९३१ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगर, ठाणे, कळवा आणि मुंब्रा भागातील ५४ लाख शिधावाटप पत्रिकेवर धान्य देण्यात येत असून २१ लाख ८२ हजार ५२५ शिधावाटप पत्रिकाधारकांना आधार कार्डाशी लिंक केले नसल्याने त्यांना शिधावाटप पत्रिकेवर धान्य व इतर वस्तु मिळत नसल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील लोकप्रतिनिधींनी शिधावाटप नियंत्रक यांची मुंबई कार्यालयामध्ये भेट घेऊन आधारसक्ती मागे घेण्यासाठी दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे तसेच ठाणे जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी शिधावाटप उपनियंत्रक अधिकारी यांची दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास भेट घेऊन तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने आधारकार्ड शिधावाटप पत्रिकेशी लिंक करण्याची सक्ती करण्यात येऊ नये असा निर्णय दिला असला तरी मुंबईत रेशनकार्ड आधारकार्डला लिंक करण्याचे केवळ ५० टक्केच काम पुर्ण झाले असल्याने ५० टक्के लाभार्थी अन्नाच्या मुलभूत गरजेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील भोकर (जि.नांदेड) व मुंबईत अवैधरित्या गुटखा विक्री सुरु असल्याबाबत

**(१९) * ११७२८४ श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संजय कदम (दापोली), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.संतोष**

**टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भोकर (जि.नांदेड) येथे गुटखा विक्री सुरु असून यावर विभागाने नाममात्र कार्यवाही केली असणे तसेच मुंबईतील जोगेश्वरी, नालासोपारा, वाशी, सांताक्रुझ, अंधेरी व भिवंडी येथे गुटख्यांची मोठी गोदामे असून सदर ठिकाणी २० कोटी रुपयांच्या गुटख्यांचा साठा असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये व सिंधुदुर्ग जिल्हयातील बांदा येथे दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास रुपये ५५ लाख रुपयांचा अवैध गुटखा तसेच कोपरगाव (जि.अहमदनगर) शहरात रुपये ६१ हजार, श्रीगोंदा शहरात १ लाख रुपयांचा गुटखा पोलसिांनी टाकलेल्या धाडीमध्ये जप्त केल्याचे तसेच पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हददीत सुकापूर भागात पोलिस व अन्न्न औषध प्रशासनाने संयुक्त कारवाई करुनदिनांक ३ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास अंदाजे रुपये २ लाख १८ हजारांचा गुटखा व इतर अन्न्नपदार्थ जप्त केल्याचे  तसेच पुण्यात चाकण, कोंढवा आणि कात्रजमधील भांगडेवाडीत ट्रकद्वारे गुजरातमधून गुटख्याची आयात होऊन पोलीस यंत्रणेच्या सहकार्याने दरमहा रुपये ५०० कोटींचा गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुटखा किरकोळ विक्रेत्यांकडे तसेच फेरीवाल्यांच्या माध्यमातून पानपट्टी दुकानदारापर्यंत पोहचविला जात असून रसायन मिश्रित आरोग्यास घातक असलेल्या गुटख्यामुळे अनेकांचा मृत्यू झाल्याचे तसेच शासनाने गुटखा विक्रीवर बंदी घातली असूनही राज्यात गुटखा सहज उपलब्ध होत असून अनेक शहरात त्याची जादा दराने विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुटखा तस्करांशी आर्थिक संबंध असणारे पोलीस, अन्न व औषध प्रशासन, आरटीओ चेकपोस्ट या सर्व अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे राज्यात गुटख्याची मोठ्या प्रमाणात तस्करी केली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी व गुटखा तस्कारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रशासनाने चौकशी केली आहे. तसेच प्रशासनाच्या वेळोवेळी कारवाई अंतर्गत राज्यात ३९.८४ कोटी रकमेचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा चालू वर्षात जप्त करण्यात आला आहे. तसेच ७१२ खटले दाखल करण्यात आले आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

तथापि, प्राप्त तक्रारीवर शासनस्तरावर चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भ्वत नाही.

-----------------

## राज्यात बॅटरी व्यवसायात नियमांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(२०) * ११६६९१ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बॅटरी उद्‌योग तसेच बॅटरी विक्री करताना केंद्र शासनाच्या नियमांची अंमलबजावणी केली जात नसल्याने ॲसिड हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून (MPCB) पर्यावरण प्रमाणपत्र न मिळवता राज्यात बॅटरी उद्‌योग सुरु असून केंद्र शासनाच्या सन २००१ मध्ये तयार करण्यात आलेल्या दि बॅटरीज मॅनेजमेंट अँड हँडलिंग नियमावलीनुसार वाहनांमधील बॅटरीची निर्मिती, पुनर्वापर आणि विक्रीबाबत परवाना आवश्यक असणे व बॅटरी ॲसिडची धोकादायक म्हणून नोंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या सदर अधिसूचनेला १६ वर्ष होऊनही पर्यावरण विभागाने बॅटरी उद्‌योग संदर्भात राज्यात कोणतेही आदेश निर्गमित केले नसल्यामुळे ॲसिड हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) अशा प्रकारची घटना निदर्शनास आली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मडळाकडून वेळोवेळी आदेश / परिपत्रक निर्गमित करण्यात आलेली आहेत. तथापि ॲसिड हल्ल्याच्या घटनामध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील औषधविक्रेत्यांच्या परवान्याचे नूतनीकरण करण्याबाबत

**(२१) * ११७९७७ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पास्कल धनारे (डहाणू), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल),**

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रुग्णांच्या आरोग्याच्या दृष्टीने औषध विक्रेत्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण आवश्यक असताना अन्न व औषध प्रशासन विभागाकडून ते करण्यात आले नसल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषधे व इंजेक्शन यांची तपासणी न करता विक्रीला परवानगी दिल्याने नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी (कॅग) आक्षेप नोंदविले असल्याने शासनाच्या दुर्लक्षामुळे रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाजारात विकले जाणारे खाद्य पदार्थ आणि औषधांची तपासणी करुन त्याची गुणवत्ता तपासण्याची तसेच औषध विक्रेत्यांच्या परवान्यांची तपासणी करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनावर असताना १,५३५ औषध विक्रेत्यांचे परवाने आणि १,२८६ औषध दुकानांची तपासणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औषध विक्रेत्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोनाळा (जि.वाशिम) धरणावरुन मोतसावंगा धरणात पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईनचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२२) * १२१५१४ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनाळा (जि.वाशिम) धरणावरुन मोतसावंगा धरणात पाणी पुरवठा करणाऱ्या पाईन लाईन योजनेला धरणात पाणी नसतांना मुदत वाढ देणे, सदर योजनेच्या कामास दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी रुपये साडेचार कोटीची मान्यता देणे, प्रशासकीय मान्यता देतांना अटींमध्ये सदर योजना दिनांक १५ मे, २०१८ रोजीपर्यत पूर्ण करण्याचे बंधन असूनही अद्‌याप प्रलंबित असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

मुख्याधिकारी, नगरपरिषद मंगरुळपीर यांच्या अहवालानुसार सोनाळा प्रकल्पाचा मृत साठा १.८० ते २.१० द.ल.घ.मी. असल्याचे कार्यकारी अभियंता, वाशिम पाटबंधारे विभाग, वाशिम यांनी दि. १५.०३.२०१८ च्या पत्रान्वये कळविले होते. या योजनेकरिता अंदाजे ०.२० ते ०.२२ द.ल.घ.मी. पाण्याची आवश्यकता होती. त्यामुळे धरणात पाणी नसताना योजनेस मुदतवाढ देण्यात आली, हे खरे नाही. शासनस्तरावरुन योजना पूर्ण करण्यास अद्‌याप मुदतवाढ देण्यात आलेली नाही.

नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी मंगरुळपीर नगरपरिषदेने पाणी टंचाई निवारणार्थ टँकरव्दारे पाणी पुरवठा केलेला आहे.

(२) जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडून या योजनेच्या झालेल्या कामाची तसेच याप्रकरणी झालेल्या विलंबाची सविस्तर चौकशी करुन जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्याबाबतचा अहवाल शासनास एक महिन्यात सादर करण्यात यावा असे शासन स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हापरिषदेच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमध्ये आरटीईप्रमाणे भौतिक सुविधा देण्याबाबत

**(२३) * ११९०९२ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १ लाख १० हजार ३१५ शाळांपैकी ३ हजार ३४८ शाळांत मुलांची व २०१८ मुलींची शौचालये नाहीत तर असलेल्या पैकी ७ हजार ६० शाळांतील शौचालये वापराविना पडून असून ३ हजार ६५३ शाळांमध्ये शौचालय नसल्याचे सन २०१७-१८ मध्ये यु-डायस या संस्थेने केलेल्या पाहणी अहवालातून माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नागपूर जिल्ह्यातील १९६८ शाळा या शौचालय आणि क्रीडांगणाविना असल्याचे शिक्षण विभागाच्या अहवालातून माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात एकूण २ हजार ९३४ शाळा आहेत त्यापैकी जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवी पर्यंतच्या १७९१ शाळा असून त्यामध्ये ७८० तर ११४३ खाजगी शाळांपैकी १८६ शाळांनी पूर्ण सुविधा दिल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शाळांमध्ये स्वतःची इमारत, कार्यालय मुख्याध्यापकांचा स्वतंत्र कक्ष प्रत्येक शिक्षकांना शिकविण्यासाठी स्वंतत्र वर्ग खोली मुली व मुलांकरिता स्वंतत्र प्रसाधनगृह पाण्याची स्वंतत्र सोय खेळाचे मैदान आणि पोषण आहार शिजविण्यासाठी स्वयंपाकगृहाची व्यवस्था असणे बंधनकारक आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील जिल्हापरिषदेच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असलेल्या अनेक शाळांमध्ये आरटीईप्रमाणे भौतिक सुविधाच मिळत नसल्याचे तसेच राज्यातील सुमारे १३०० शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला त्याच सुमारास 'क्राय' या संस्थेने राज्यातील ८ जिल्हयांतील १२२ शाळांमध्ये सर्व्हे केला असता त्यामध्ये ५७% शाळांना पूर्णवेळ मुख्याध्यापकच नाहीत, ६९% शाळांमध्ये तर शिक्षक व विद्यार्थ्यांनाच शौचालय स्वच्छ करावे लागते, १३% शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या असून ३७% शाळांना सरंक्षक भति नसल्याबाबत निष्कर्ष नोंदविला असल्याचे यु-डायसच्या अहवालातून निदर्शनास आणण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

नागपूर जिल्हयातील ४१११ शाळांपैकी ८० शाळांना शौचालय व ३८९ शाळांना क्रीडांगण उपलब्ध नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार शाळेस पक्की इमारत, मुख्याध्यापक/ कार्यालयीन कक्ष, प्रत्येक शिक्षकास १ वर्गखोली, मुलांकरिता व मुलींकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, किचनशेड या सुविधा उपलब्ध करावयाच्या आहेत.

(५) क्राय संस्थेने ८ जिल्हयामधील १२२ शाळांच्या केलेल्या सर्व्हेमध्ये कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहेत. याबाबत अहवालात नमूद केले आहे.

(६) राज्यातील बहुतांश शाळांत उपरोक्त सुविधा उपलब्ध आहेत. तसेच ज्या ठिकाणी सुविधा उपलब्ध नाही तेथे निधी उपलब्धतेनुसार त्या पुरविण्याची तजवीज ठेवली आहे.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

**(२४) * १२१२५३ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात मंदरळे, पडवे व तळगाव गावातील पाच वाडयांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याने टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर तालुक्यातील १४ नळपाणी योजनांची कामे अपु-या स्थितीत असल्याने नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर गाव/वाडयांना पाणीपुरवठा करणे तसेच नळपाणी योजनांची कामे पूर्ण करुन पाणीटंचाई दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर तालुक्यातील राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत १० नळपाणी योजनांपैकी दोन योजनांद्वारे पाणी पुरवठा सुरु असून ६ योजनांचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत दोन योजनांचे काम सुरु करण्यात आलेले नाही. सद्य:स्थितीत अस्तित्वातील स्त्रोताद्वारे पाणी पुरवठा होतो.

(३) सदर अपूर्ण योजना पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर लेखी स्वरुपात पाठपुरवा सुरु आहे. शासनाच्या दिनांक ०९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये

ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती योजनेचे काम पूर्ण करीत नसल्यास सदर योजना जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील बंद करण्यात येणा-या शाळेतील वदि्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत समायोजन करणेबाबत

**(२५) * १२२०५९ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील पूर्वी वस्तीशाळा म्हणून ओळखल्या जाणा-या व आता प्राथमिक शाळेत रुपांतर झालेल्या २० शाळांची गुणवत्ता ढासळल्यामुळे व पटंसख्या कमी असल्यामुळे शाळा बंद करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी यांनी माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, कन्नड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील १० शाळा बंद करण्याबाबत शिक्षणसंचालक, पुणे यांनी माहे फेब्रुवारी,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान कळविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शाळा बंद केल्यास, विदयार्थ्यांची गैरसोय व शिक्षणापासून वंचित रहाणार असल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्येचिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळांमध्ये समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ६ शाळांचे पट शून्य झाल्याने त्या बंद असून ७ शाळांमध्ये १० पेक्षा कमी पटसंख्या असल्याने त्यातील विद्यार्थ्यांचे नजीकच्या शाळेत समायोजन केले आहे.

(२) कन्नड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील १० पेक्षा कमी पटसंख्याच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत समायोजन करण्याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांनी कळविले आहे.

(३) नाही.

(४) विद्यार्थ्यांचे समायोजन नजिकच्या गुणवत्तापूर्ण शाळेत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(२६) * ११७२२४ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड, मोखाडा, जव्हार तसेच वाडा (जि.पालघर) तालुक्यातून भातसा, तानसा, वैतरणा, पिंजाळ व देहार्जे या चार बारमाही नद्या वाहत असून पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील नियोजनाच्या अभावामुळे गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत असणे तसेच काही गावांत ४० ते ५० दिवस पाणी पुरेल इतकाच पाणी साठा शिल्लक असल्याने नागरीकांना माहे फेब्रुवारी महिन्यापासूनच पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाडा तालुक्यातील साखरे, ओगदा, मोखाडा तालुक्यातील ९ गावे आणि १९ पाडे, विक्रमगड तालुक्यातील तादडे, जांभा-पोचाड, हातने, खाड-उघानीपाडा, टेटवाली, उपराळे आणि उटावली-पोटखल व इतर अशा १० ग्रामपंचायतीतील गावांसाठी सन २००५ पासून सुरु केलेल्या १० योजनांपैकी ६ योजना १३ वर्षापासून तर ४ योजना ६ वर्षापासून प्रलंबित असून या नळपाणी योजनांसाठी आतापर्यंत रुपये १ कोटी ९७ लाख ५ हजार खर्च करण्यात येऊनही सदर योजनेची कामे प्रलंबित असल्याने कंत्राटदार व यांस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी जिल्हा प्रशासनाला १ वर्षापुर्वी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त अपूर्ण योजनांच्या संदर्भात स्थानिक नागरीकांनी जिल्हापरिषद प्रशासनाकडे अनेकवेळा लेखी तक्रारी/निवेदने देवूनही दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत पाण्याचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. परंतु पालघर जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीनुसार काही भागात पाणी टंचाई उद्भवू शकते. सदर बाब विचारात घेऊन सन २०१७-१८ मध्ये विक्रमगड तालुक्यामध्ये ३८ विंधन विहिरी खोदाई करुन त्यावर ३८ हातपंप, जव्हार तालुक्यामध्ये ३ विंधन विहीर खोदाई करुन ३ हातपंप व वाडा तालुक्यामध्ये ५७ विंधन विहिरी खोदाई करुन ५७ हातपंप यांची उभारणी करुन सुरळीत पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

विक्रमगड तालुक्यातील ७, वाडा तालुक्यातील ८ गाव /पाडे येथील नळपाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती करणे प्रस्तावित असून निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. टंचाई आराखडा सन २०१७-१८ मध्ये जव्हार, मोखाडा, वाडा व विक्रमगड तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला.

(२) हे खरे नाही.

सदर १० योजनांपैकी केव, साखरे व देहर्जे या तीन नळ पाणी पुरवठा योजना न्यायप्रविष्ठ आहेत. दादडे, जांभा पोचाडे व हातणे या तीन नळ पाणी पुरवठा योजनांची कामे बंद असून कामे पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा सुरु आहे. उपराळे काकडपाडा, टेटवाली बागपाडा, औंदेखांड, उटवली पोटखळ या योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) हे खरे नाही.

बहुजन मुक्ती पार्टी संघटनेने विक्रमगड तालुक्यातील टेटवाली योजनेबाबतच्या समस्या निवारणार्थ धडक रास्ता रोको आंदोलन करण्याबाबत दिनांक ११.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार दिनांक १५.०४.२०१७ रोजी आंदोलन करण्यात आले. अपूर्ण योजनांच्या संदर्भात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) व (५) सदर योजनांची कामे पूर्ण करण्याच्यादृष्टीने गटविकास अधिकारी (प्रभारी) यांच्यासमोर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांच्या कामांची सुनावणी दिनांक १९.०७.२०१७ रोजी घेण्यात आली. परंतु, संबंधित समित्या संबंधित योजनांचे काम करण्याबाबत उदासिन आहेत. आता शासनाने दिनांक ०९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयानुसार सर्व योजना अंमलबजावणी जिल्हा परिषद स्तरावर करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील मुंबई विद्यापीठाचे उपकेद्र सुरु करणेबाबत

**(२७) * ११८७०० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील**

**(उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथे मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊनही उपकेंद्र सुरु केले जात नसल्याने महापालिका सदर उपकेंद्राची जागा ताब्यात घेणार असल्याबाबत कल्याण-डोंबिवली महापालिकेचे महापौर यांनी दिनांक ०४ मे, २०१८ रोजी तसेच त्यासुमारस मुंबई विद्यापीठचे कुलगुरु यांचेकडे विनंतीपत्रे पाठविलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त उपकेंद्राचे काम अतिशय संथ गतीने सुरु असल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून उपकेंद्र माहे जून २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सुरु करण्यात येणार आहे हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त उपकेंद्राबाबत धोरण निश्चित करण्यासाठी डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालानुसार उपकेंद्राबाबतचे धोरण स्विकारावे किंवा कसे ही बाब तपासण्यात येत असल्याने त्यावर शासनस्तरावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार परिसरातील हजारो विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी कल्याण येथील उपकेंद्र लवकरात लवकर सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे. विद्यापीठाच्या निधीअभावी व काही तांत्रिक कारणांमुळे काम संथगतीने सुरु आहे. तथापि, शैक्षणिक वर्षे २०१८-१९ पासून सदर उपकेंद्रामध्ये दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे केंद्र सुरु करण्याबाबत मुंबई विद्यापीठ सकारात्मक आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शैक्षणिक वर्षे २०१८-१९ पासून सदर उपकेंद्रामध्ये स्कूल ऑफ इंजिनिअरींग अंतर्गत M.Tech (Computer Engineering) चा कोर्स सुरु करण्याचा मानस आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात विशेषतः लोणार तालुक्यातील पाणी टंचाई दूर करणे व जिल्हा हागणदारी मुक्त करण्याबाबत

**(२८) * ११९०६७ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयात विशेषत: लोणार तालुक्यात भुगर्भातील पाणी पातळी खालावली असल्याने तसेच ९१ प्रकल्पांत ७ टक्के जलसाठा असून ३३ प्रकल्प कोरडे पडल्यामुळे मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील ६६ व इतर २५५ गावांमध्ये माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच जिल्हयात फेब्रुवारी, २०१८ अखेर जिल्हा हगणदारीमुक्त करण्याच्या शासनाच्या आदेशान्वये विभागीय आयुक्तांनी सूचना दिल्या असतांनाही निधी अभावी जिल्हयातील शेकडो शौचालयाची कामे प्रलंबित असून काही ठिकाणी मंजूर होऊनही प्रत्यक्षात शौचालये बांधण्यात आली नसल्याने कागदावरील अहवाल व प्रत्यक्ष क्षेत्रीय स्थितीमध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, बुलढाणा जिल्हा हगणदारीमुक्त घोषित करण्यात आला असला तरी पाण्याअभावी अस्तित्वात असलेली शेकडो शौचालये बंद असल्याने स्वच्छता अभियान अयशस्वी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार उक्त जिल्हयात पाणी पुरवठा करणे व जिल्हा हागणदरी मुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) बेसलाईन सर्वे २०१२ प्रमाणे सर्व कुटुंबांना शौचालयाची सुविधा देण्यात आली असून सर्वांनी शौचालय वापरावे अशी अपेक्षा आहे. पाण्याअभावी शौचालयाचा वापर होत नाही ही धारणा बरोबर नाही. सध्या बांधलेल्या शौचालयाच्या वापरासाठी तेवढेच पाणी लागते जेवढे पाणी उघडयावर शौचासाठी लागते. शौचालयाच्या सातत्याने वापरासाठी जन जागृती मोहिम सातत्याने राबविणे सुरु आहे. जिल्हयातील पाणी टंचाई निवारणार्थ जिल्हयाचा २०१८-१९चा पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये एकूण ९३९ गावांमध्ये रु.२२६४.५२ लाख किंमतीच्या १४७२ उपाययोजनांचा समावेश करण्यात आला असून आवश्यकतेप्रमाणे त्यांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातपूर व अंबड (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांचे सांडपाणी भूमिगत गटाराऐवजी नैसर्गिक नाल्यात सोडत असल्याबाबत

**(२९) * ११८३४५ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातपूर व अंबड (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांना परवागनी देतांना सर्वच विभागाकडून सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्याचे नमूद असतांनाही भूमिगत गटार न बांधता सांडपाणी नैसर्गिक नाल्यात सोडत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०१८ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सातपूर औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांनी सांडपाणी उघडयावर सोडल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने दोषी आढळून आलेल्या ८ कारखान्यांना उत्पादन बंद करण्याचे व ४३ उद्योगाना कारणे दाखवा नोटीसा मे-२०१८ मध्ये बजावण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १०० शाळा सुरु करण्याबाबत

**(३०) * ११७५८१ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षणाचा दर्जा आंतरराष्ट्रीय पातळीवरचा असावा याकरिता स्थानिक स्वराज्य संस्था, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग व शालेय शिक्षण विभाग यांच्या शाळांमधून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १०० शाळा निर्माण करण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ज्याप्रमाणे राज्य शिक्षण मंडळ, केंद्रीय माध्यमिक मंडळ (सीबीएसई) आणि अन्य माध्यमिक मंडळाच्या शाळा चालविल्या जातात त्याच धर्तीवर शिशुवर्गापासून ते इयत्ता बारावीपर्यंत राज्यात १०० आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा चालविण्याचा निर्णय घेतला असून येत्या शैक्षणिक वर्षापासून १३ जिल्हयात १३ शाळा सुरु करण्यात येणार असून येत्या जून पासून सुरु होणाऱ्या अभ्यासक्रमाच्या पहिल्या टप्प्यात बाल वर्ग ते इयत्ता ३ री पर्यंत अभ्यासक्रम शिकविला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पहिल्या टप्प्यात सुरु करण्यात यावयाच्या १३ जिल्हयांची निवड कोणत्या निकषावर करण्यात आली, विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी कोणत्या अटी व शर्ती निश्चित केल्या आहेत तसेच या शाळांपैकी प्रत्येकी किती शाळा इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, तेलगु, कन्नड व तामिळ माध्यमातील आहेत व शाळांमध्ये कोणकोणत्या प्राथमिक मुलभूत सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, या शाळांच्या अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र व स्वायत्त्त "महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ" तयार केले असून या शाळांसाठी एक समिती गठित करण्यात आली आहे, हे ही ही खरे आहे काय,असल्यास, या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दर्जाच्या १०० शाळा निर्माण करण्याचा शासन निर्णय क्र.शैगुवा२०१७/प्र.क्र..१५२/१७/एसडी-६ दि. ३० नोव्हेंबर, २०१७ नुसार काढण्यात आलेला आहे त्यानुसार आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा तयार करण्यासाठी शाळा निवडीचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

(४) आंतरराष्ट्रीय शाळा मंडळाचे व्यवस्थापन, पर्यवेक्षण व नियंत्रण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ समितीची स्थापना शासन निर्णय क्र.शैगुवा-२०१८/प्र.क्र.२/१८/एसडी-६ दि. १२ मार्च, २०१८ नुसार स्थापन करण्यात आलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार समित्यांची रचना व कार्य निश्चित करण्याचे अधिकार स्थायी समितीस देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील १५८ प्राथमिक, ६३१ माध्यमिक शाळा व काही तुकड्यांना अनुदान देण्याचा घेतलेला निर्णय

**(३१) * १२२६८५ श्री.योगेश सागर (चारकोप), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानीत शाळांना अनुदान देण्यासाठी राज्य सरकारने दिनांक १ व २ जुलै २०१६ रोजी वा त्यासुमारास राज्यातील १५८ प्राथमिक, ६३१ माध्यमिक शाळा व काही तुकड्यांना अनुदानास पात्र ठरविले होते तसेच या सर्व पात्र शाळांना आणि तुकड्यांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ९ मे २०१८ रोजी वा त्यासुमारास जाहिर झालेल्या शासन निर्णयात ५१ माध्यमिक शाळा, १९ माध्यमिक शाळांमधील ५४ तुकड्यांवरील ३७३ शिक्षकांच्या व १७८ शिक्षकेतर पदांना वगळण्यात आले असल्याचे दिनांक ११ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयामुळे या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शासन निर्णय, दिनांक १ व २ जुलै, २०१६ अन्वये १५८ प्राथमिक व ६३१ माध्यमिक शाळा व ५०४ प्राथमिक १६०५ माध्यमिक शाळांच्या तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आले.

(२) होय.

(३) व (४) नाही. मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. ३/२०१८ मधील मुद्यांच्या अनुषंगाने सदर शाळांबाबत सखोल तपासणी करुन निर्णय घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) मुंबई येथे जिल्हा क्रीडा संकुलाच्या प्रलंबित बांधकामाबाबत

**(३२) * १२०१४१ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील मौजे-मरोळ व मौजे- कोंडीविट येथील अनुक्रमे न. भू. मा.क्र. ४३२ व १६७ या भूखंडावरील क्रीडा संकुलाच्या कामाकरीता प्राप्त जागेवरील अतिक्रमण रोखणे, जागा सुरक्षित ठेवणे तसेच संरक्षण भिंतीच्या कामाकरीता निधी उपलब्ध होऊन निविदा-प्रक्रिया व कंत्राटदाराची नियुक्ती झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त भूखंडावरील आरक्षण बदल प्रस्ताव व जिल्हा क्रीडा संकुलाचा सुधारित आराखडा सन २०१६ मध्ये मंजुरीसाठी मुंबई महानगरपालिकेकडे पाठवला असून सदर आरक्षण बदल प्रस्ताव व सुधारित आराखड्यांना महानगरपालिकेने मंजुरी दिली असल्याचे तसेच सन २०३४ बृहन्मुंबई विकास नियोजन आराखड्यामध्ये सदर भूखंडावर क्रीडा संकुलाचे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर क्रीडा संकुल बांधण्याकरिता सन २०१५ पासून स्थानिक लोकप्रतिनिधीनी सातत्याने पाठपुरावा करुनही तसेच पालकमंत्री व क्रीडामंत्री यांनी वारंवार आदेश देऊनही आराखडे व अंदाजपत्रके बनवून क्रीडा विभागाने निधीची तरतूद केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामाच्या कार्यारंभास जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी आवार भिंतीचे आराखडे उपलब्ध करून दिले असून सदर संरक्षण भिंतीच्या कामास अद्यापही कार्यारंभ झालेला नाही, हे ही खरे आहे,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार सदर संरक्षण भिंतीचे काम लवकरात लवकर सुरु करून दीर्घकाळ प्रलंबित असलेले क्रीडा संकुलाचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मरोळ न.भू.क्र.४३२ मधील १४,७७० चौ.मी. जागेपैकी केवळ ५७०० चौ.मी. मोकळी जागा शिल्लक असून उर्वरित भूखंडावर जवळपास ५०० पात्र/अपात्र अशा समिश्र झोपडया आहेत. तसेच कोंडीविट न.भू.क्र.१६७ मधील १२,२६८ चौ.मी. जागेपैकी ३,५०० चौ.मी. मोकळी जागा शिल्लक असून उर्वरित जागेवर २५० ते ३०० पात्र/अपात्र अशा समिश्र झोपडया आहेत. सदर अतिक्रमण हटवून संरक्षक भिंतीचे काम सुरु करण्यात आले होते. तथापि, संरक्षक भिंतीचे काम करणाऱ्या कंत्राटदारास अतिक्रमणामध्ये पाडलेल्या झोपडीधारकांनी मारहाण केली व काम करण्यास विरोध दर्शविला. त्यामुळे अतिक्रमीत झोपडयांबाबत निर्णय होईपर्यंत एकूण २६,७३९ चौ.मी. जागेपैकी मोकळी जागा किती उपलब्ध होत आहे याबाबतची माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्याठिकाणी विकसित करावयाच्या बाबी व त्यांचे अंदाजपत्रक तयार करता येत नसल्याने निधीची तरतूद केली नाही.
(४) व (५) न.भू.क्र.१६७ या ठिकाणी आवार भिंतीचे काम सुरु करण्यात आले होते. तथापि, अतिक्रमित झोपडीधारकांनी कामास विरोध केल्यामुळे व कंत्राटदाराच्या कामगारांना मारहाण केल्यामुळे सध्या काम बंद आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने कोंदिविटा येथील ७००० चौ.मी. व मरोळ येथील ४००० चौ.मी. जागेवर संरक्षक भिंत कोठे बांधावयाची याबाबत विचारणा केली होती. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांना देण्यात आलेल्या नकाशामध्ये कोणत्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधावी याबाबत मार्किंग करुन द्यावे आणि पात्र झोपडया वगळून

मोकळया जागी संरक्षक भिंत बांधावी अशा सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभागास मार्किंग करुन देण्यात आले असून लवकरच संरक्षक भिंतीच्या बांधकामास पुनश्च: सुरुवात करण्यात येत आहे. उक्त जागेवरील पात्र / अपात्र झोपडयाबाबत माहिती घेऊन त्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या मोकळया जागेवर क्रीडा संकुलाच्या बाबी विकासीत करण्याचे प्रस्तावित असून सदर जागा संरक्षित व्हावी यासाठी बंद असलेले काम सुरु करण्याबाबतची कार्यवाही संकुल समितीमार्फत करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील कराखान्यांतुन सोडण्यात येणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे प्रदुषणात होत असलेली वाढ

**(३३) * १२२१३२ श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.धैर्यशील पाटील (पेण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर येथील माहीम गावातील पाणेरी नदीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील दुषित पाणी सोडल्यामुळे नदीच्या प्रदुषणात वाढ होणे, बोअरवेल व विहिरींचे पाणी दुषित होऊन नागरीकांना आरोग्यविषयक समस्या निर्माण होणे, वसई तालुक्यातील (जि.पालघर) वालिव, गोखिवरे, नवघर, सातिवली, चिंचपाडा या भागातील औद्योगिक वसाहतीमधील तयार होणारी घातक रसायने नायगाव पूर्व सोपाराखाडीत सोडण्यात येत असल्यामुळे परिसरातील प्रदुषणामध्ये वाढ होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोईसर (जि.पालघर) येथील तारापूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र सन २००८ मध्ये उभारले असून या केंद्राची क्षमता २५ दशलक्ष लीटर प्रति दिन इतकी असताना उद्योगांकडून त्यापेक्षा जास्त पाण्यावर प्रक्रिया केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील रासायनिक प्रदुषित सांडपाण्यामुळे नवापुर, दांडी, उच्छेळी व मुरबे या सर्व खाडया प्रदुषित होवून मासे मृत पावणे तसेच रसायनामुळे परिसरातील खारफुटीही नष्ट झाल्याचे माहे एप्रिल-मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या विस्तारित प्रकल्पास शासनाकडून विलंब होत असल्याने अतिरिक्त रासायनिक सांडपाणी येत असल्याने नवापूर, दांडी, उच्छेळी, मुरबे भागातील समुद्राचे पाणी तसेच परिसरातील सर्व खाडया प्रदूषित होऊन मासेमारी धोक्यात आल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, खाडीतील मासे मृत्यूमुखी पडल्याने पारंपारिक मासेमारी करणाऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याने त्यांनी तारापूर औद्योगिक परिसरात सीईटीपी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये ३० ते ४० किलो मृत मासे गोळा करुन टेबलांवर व इतरत्र टाकून आपला संताप व्यक्त केला होता, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन माहिम नदी तसेच पालघर जिल्ह्यातील खाडया प्रदुषणमुक्त करण्यासाठी कार्यवाही करुन यात दोषी असलेल्या कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) हे खरे आहे.

(६) मा.जिल्हाधिकारी पालघर यांनी दिनांक ०९.०४.२०१८ रोजी नवापूर येथे घडलेल्या मासे मर्तुकिची गंभीर दखल घेऊन दिनांक १३.०४.२०१८ रोजी विशेष समिती गठित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन संमतीपत्रातील अटी व शर्तीची तपासणी केली जाते. तसेच प्रक्रियाकृत सांडपाण्याचे नमुने संकलित करण्यात येतात. सदर भेटी दरम्यान संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास दोषी उद्योगांना प्रस्तावित निर्देश, अंतरिम आदेश अथवा बंदचे आदेश बजवण्यात येतात. भेटी दरम्यान दोषी आढळलेल्या एकूण ०८ उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले असून सदर पैकी ०३ उद्योगांनी सादर केलेल्या प्रदूषण नियंत्रणबाबतच्या उपाययोजना व प्रतिज्ञापत्राच्या आधारे काही अटी व शर्थीस अनुसरुन उत्पादन पुन:श्च सुरु करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत

-----------------

## राज्यातील अनधिकृत शाळांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(३४) * ११७०९९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर),**

**श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये राज्य शासनाची अथवा मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता तसेच शिक्षण हक्क कायद्यातील पात्रता निकष पूर्ण न करणाऱ्या २३१ शाळा अनधिकृतपणे सुरु असून उक्त शाळा बंद होण्याच्या मार्गावर असल्याने ४० हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार असल्याने या शाळांना मान्यता देण्याबाबतचे धोरण शिथील करण्याची मागणी महापालिकेच्या शिक्षण समितीच्या अध्यक्षांनी केली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गत वर्षी राज्यातील ५८२ शाळा अनाधिकृत असल्याचे जाहीर केले असून यापैकी पुणे जिल्हयात ८५ अनाधिकृत शाळा तसेच नवी मुंबई महापालिका क्षेत्रात १४ विनापरवाना शाळा सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हापरिषदेच्या शिक्षण विभागाकडून दरवर्षी मे महिन्यात अनधिकृत शाळांची यादी प्रसिध्द करण्यात येत असून गतवर्षी प्रसिध्द करण्यात आलेल्या ३४ अनधिकृत शाळांची नावे यावर्षीच्या यादीतही पुन्हा जाहिर करण्यात आली असून सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शासनाची परवानगी प्राप्त झाल्याशिवाय सदर शाळा पुन्हा सुरु करु नयेत असे आदेश जिल्हापरिषदेने उक्त संस्थांना देऊनही सदर शाळांमध्ये संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात १ हजार ९२ शाळा अनधिकृतपणे पूर्वपरवानगीशिवाय सुरु असून मुंबई मध्ये २२२, पालघर २०८ आणि ठाणे येथे १८५ अनधिकृत शाळा असून या अनधिकृत शाळांमध्ये पहिली ते आठवी या वर्गात १ लाख ३४ हजार ६६२ तर नववी ते बारावी ८ हजार १२८ विद्यार्थी शिकत असल्याचे यू-डायस अहवालातून माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान  निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईतील शाळा बंद झाल्यास ३५ ते ४० हजार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणार असून ही मुले शाळाबाह्य होण्याची भीती आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त शाळेतील विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) याबाबतचे निवेदन / पत्र शासनास सादर झालेले नाही.

(२) होय.

(३) रायगड जिल्ह्यातील ३२ अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली असून या अनधिकृत शाळेत प्रवेश न घेण्याचे सूचित केले आहे. तसेच अनधिकृत शाळा बंद करण्याबाबत नोटीस दिली आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) नाही.

(६) सदर अनधिकृत शाळांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून याबाबत कार्यवाही सुरु आहे. अनधिकृत शाळा बंद करताना त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे लगतच्या मान्यताप्राप्त शाळेमध्ये समायोजन करण्यात येते.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(३५) * ११७१०९ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्याला पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने रानसई व पुनाडे या दोन धरणांची निर्मिती केली असतांनाही एप्रिल महिन्यातच तालुक्यात पाणी टंचाई निर्माण होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील गावांत पाणी टंचाई निर्माण होण्याची कारणे काय आहेत तसेच सदर पाणी टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

उरण तालुक्यातील पाणी टंचाई भासण्याची शक्यता असलेल्या ८ आदिवासी वाडयांचा समावेश २०१७-१८ च्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयात करण्यात आलेला आहे.

त्यापैकी रानसई ग्रामपंचायत अंतर्गत एकूण सहा आदिवासी वाडया असून त्यापैकी भुऱ्याची वाडी व खैरवाडी या २ वाडया रानसई पासून २ कि.मी. अंतरावर व उंचावर आहेत. त्यामुळे उन्हाळयात या वाडयांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याने ग्रामपंचायतीमार्फत टँकरव्दारे पाणी पुरवठयाची सोय करुन पाणी टंचाई दूर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेंदोळा बु. माळेगाव, मार्डी व मौजा सालोरा खुर्द (ता.तिवसा, जि.अमरावती) व इतर गावातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(३६) * १२०१९६ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील शेंदोळा बु. माळेगाव, मार्डी व मौजा सालोरा खुर्द (ता.तिवसा) व मौजे सालोरा (खुर्द) (ता.मोर्शी) या गावात पाणीटंचाई असल्याने गामस्थांची गैरसोय होत असल्याचे तसेच लोहेगाव (ता.मोर्शी, जि.अमरावती) चौकात पाण्यासाठी चक्काजाम आंदोलन केल्यामुळे दोन तास वाहतूक ठप्प होऊन परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे सालोरा (खुर्द) येथील पाणीपुरवठा वितरण व्यवस्था ही फार जूनी असुन दुरुस्ती करिता वारंवार खर्च करुनही गावात शेवटच्या टोकापर्यत पाणीपुरवठा होत नसल्याने नविन पाईप लाईनसाठी तसेच रेवसा येथील पाण्याची टाकी ३० वर्ष जूनी असल्याने नवीन पाण्याच्या टाकीसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत निधी मंजूर करणेबाबत स्थानिक लोकपतिनिधींनी कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा, अमरावती यांना दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवदेन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच भातकुर्ली तालुक्यातील सोनारखेडा, जावरा, बेलमारखेडा, अंचलवाडी, पोहरा पुर्णा, टाकरखेडा या सहा गावात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यकमातंर्गत उंच पाण्याची टाकी बांधण्यासाठी निधी मंजूर करणेबाबत दिनांक १८ नोव्हेंबर,

२०१८ रोजी लेखी निवेदन दिल्याचे तसेच मोझरी विकास आराखडयांतर्गत गुरुदेवनगर, गुरुकुंज आश्रम मोझरी गावासाठी संयुक्त पाणी पुरवठा योजना कामातील त्रुटीची पुर्तता न करता ग्रामपंचायतीकडे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी हस्तांरीत केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मोझरी योजनेतील पिण्याचे पाणी ग्रामस्थांना नियमित मिळण्याकरिता सोलर सुरु करणेबाबत लोकपतिनिधींनी मुख्य अभियंता, महाराष्ट् जीवन प्राधिकरण, अमरावती यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मोर्शी तालुक्यात अप्पर वर्धा धरण असूनही या तालुक्यातील नागरीकांना दरवर्षी पाण्यासाठी आंदोलने करावी लागत असल्याने सदर तालुका व अमरावती जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अमरावती जिल्ह्यातील शेंदोळा बु. माळेगाव, मार्डी व मौजा सालोरा खुर्द (ता.तिवसा) व मौजे सालोरा (खुर्द) (ता.मोर्शी) या गावात पाणी टंचाई निर्माण झाली होती. तसेच लेहेगांव, ता. मोर्शी येथे दिनांक १४.५.२०१८ रोजी रास्ता रोको आंदोलन झाले होते हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) भातकुली तालुक्यातील सोनारखेडा, जावरा, बेलमारखेडा, अंचलवाडी, पोहरा पुर्णा, टाकरखेडा या ६ गावांचा समावेश मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांत करण्याबाबत दिनांक १८.११.२०१७ रोजी लेखी निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे.

मोझरी विकास आराखडयांतर्गत गुरुदेव नगर, गुरुकुंज आश्रम, मोझरी, या गावांकरिता पाणी पुरवठा योजना कोणतीही त्रुटी न ठेवता कार्यान्वीत करण्यात आली होती. सुमारे ४ वर्षापासून सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येत होती.

दरम्यान योजनेच्या दुरुस्तीच्या कामांना जिल्हाधिकारी, अमरावती यांनी टंचाई अंतर्गत दिनांक ०१.०३.२०१८ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती. तथापि, या कामांच्या निविदेस अपेक्षीत प्रतिसाद न मिळाल्यामुळे प्रस्तावित कामे करता आली नाहीत.

योजना ग्रामपंचायत मार्फत हस्तांतरीत करुन घेणे गरजेचे होते. परंतु, योजना ग्रामपंचायतीने हस्तांतरीत करुन न घेतल्यामुळे व सद्य:स्थितीत योजना चालविण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे दिनांक ०१.०४.२०१८ पासून योजना ग्रामपंचायतीला एकतर्फी हस्तांतरीत करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत या गावाचा पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे.

(४) हे खरे आहे.

(५) अमरावती जिल्हयातील पाणी टंचाई निवारणार्थ २०१७-१८ साठी संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा मंजुर केला आहे. त्यामध्ये १४२८ गावांत रुपये १७९९.९६ लाख इतक्या किंमतीच्या एकूण १७४५ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी आवश्यकतेनुसार २६१ गावांतील ४९५ लाख रुपये किंमतीच्या ४०८ उपाययोजना पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यासह टंचाई अंतर्गत अन्य उपाययोजनांचा समावेश आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत गणवेश अथवा गणवेशाकरिता रक्कम मिळण्याबाबत

**(३७) * ११६५९५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर**

**पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना गणवेश देण्याऐवजी त्याची रक्कम विद्यार्थ्याच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असूनही विद्यार्थ्यांची बँक खातीच न उघडल्यामुळे शैक्षणिक वर्ष संपले तरीही राज्यातील सुमारे १५ लाख तर अकोला, बुलढाणा, भंडारा, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, परभणी या जिल्हयांमध्ये ५० टक्क्याहून अधिक विद्यार्थ्यांना गणवेश अथवा त्याची रक्कमही मिळाली नसल्याचे माहे एप्रिल-मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१७-१८ या वर्षात नागपूर जिल्हयामधील जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या एकूण १७१० शाळांमधील ८४ हजार ९२१ पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांपैकी केवळ ६२ हजार ९९० म्हणजेच ७४.१७ टक्के विद्यार्थ्यांचे तर विदर्भातील नागपूर वगळता इतर जिल्हयामध्ये चंद्रपूर-७९.७७. गोंदिया ९०.७०, गडचिरोली ९०.२१, वर्धा ७५.०१, भंडारा ४१.७४, अमरावती ९८.४२, यवतमाळ ५८.०५, अकोला ४७.८८, बुलढाणा ४७.६६ व वाशिम ७०.९५ टक्के विद्यार्थ्यांचे बँक खाते उघडण्यात विभागाला यश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये पहिली ते आठवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या सर्व घटकातील विद्यार्थी, सरकारी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तसेच अनुसुचीत जाती,जमाती व दारिद्र्यरेषेखालील सर्व घटकांच्या ३७ लाख ६२ हजार २७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २ मोफत गणवेशासाठी ४०० रुपयांची रक्कम त्या विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होणे बंधनकारक असूनही अद्याप १० लाख ९० हजार ६३३ मुलांचे बँक खाते उघडले गेलेले नसल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी मंजूर करण्यात आलेले ६४ कोटी रुपये शाळांकडे पडून असल्याचे तसेच याबाबत शिक्षण विभागाचे तत्कालीन सचिव श्री.नंदकुमार यांनी १५ मे पर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार १५ लाख ८८ हजार ४८० विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांची बँक खाती उघडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये मोफत गणवेश योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी डिसेंबर, २०१७ पर्यत बँकेत खाती न उघडलेल्या विद्यार्थ्यांना थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात लाभाची रक्कम जमा करण्याच्या योजनेतून सुट देण्यात आली होती.

तसेच, स्थानिक पातळीवरील काही बँकांच्या असहकार्य धोरणामुळे विद्यार्थ्यांची Zero Balance खाती उघडण्यात अडचणी निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांची Zero Balance वर बँक खाती उघडण्याबाबत जलद कार्यवाहीसाठी बँकांना आवश्यक त्या सूचना देण्याबाबत वित्त विभागास विनंती केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विषेशत: मुंबई, कोल्हापूर, नगर, मालेगांव बाजार समिती येथे फळे पिकविण्यासाठी घातक रसायनांचा वापर होत असल्याबाबत

**(३८) * १२२६०७ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विषेशत: मुंबई, कोल्हापूर, नगर, मालेगांव बाजार समितीमध्ये आंबा, टरबुज, लिची, केळी इ. फळे पिकविण्यासाठी कार्बाईड सारख्या मानवी शरीरास घातक असलेल्या रसायनांचा वापर केला जात असल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषधे  प्रशासनाने जप्त केलेल्या ८०० फळांपैकी १६१ नमुन्यांमध्ये फळे लवकर पिकविण्यासाठी अनेक व्यापारी घातक रसायनांचा वापर करत असल्याचे आढळून आले असून सदर रसायने एका विशिष्ट मात्रेपेक्षा जास्त वापरल्याने मानवी शरीरावर त्याचा दुष्परिणाम होण्याची शक्यता असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगर व काही जिल्हयात अन्न व औषध प्रशासनाची प्रयोगशाळा नसल्याने तसेच इतर जिल्हयात तपासणीसाठी घेतलेल्या नमुन्यांची तपासणी करण्यासाठी बराच कालावधी लागणे अशा अनेक कारणांस्तव अन्न व औषध प्रशासन विभागाकडून तपासणी करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, मुंबई कृषी उत्पन्न घाऊक फळ बाजारात हापूस आंबा पिकविण्यासाठी वापरण्यात येणा-या इथरेल या बायर कंपनीच्या उत्पानावर अन्न व औषधे प्रशासनाने बंदी घातली असून कृषी खात्याने परवानगी दिल्यानंतरच ते बाजारात विक्रीसाठी खुले केले आणि दुसरीकडे एफडीए कारवाई करीत असल्याची माहिती घाऊक व्यापारी व संघटेनेचे अध्यक्ष यांनी दिनांक २५ एप्रिल २०१८ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील ज्या बाजार समित्यांमध्ये अन्न व औषध प्रशासनाची प्रयोगशाळा नसेल अशा समित्यांमध्ये प्रयोगशाळा तातडीने कार्यान्वित करणे तसेच घातक रसायनांचा वापर करणाऱ्यांवर कारवाई होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे,

(२) दि. २६ एप्रिल, २०१८ रोजी वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी प्रसिध्द झालेली आहे. सन  ऑगस्ट २०११ ते जानेवारी २०१८ या कालावधीत अन्न व

औषध प्रशासनातर्फे फळे व भाजीपाला यांचे एकूण ८०० नमूने विश्लेषणाकरीता घेण्यात आले होते. यापैकी ६२० नमुने प्रमाणित घोषित करण्यात आले आहेत. सदर नमुन्यांपैकी १६१ नमूने असुरक्षित घोषित करण्यात आले असून यापैकी १५७ प्रकरणी खटले दाखल करण्यात आले आहेत.

(३) होय, हे खरे आहे

(४) दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास घाऊक व्यापारी संघटनेकडून कोणतीही तक्रार अथवा निवेदन अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झालेले नाही. हापूस आंबा पिकविण्यासाठी येणाऱ्या इथरेल या उत्पादनावर अन्न व औषध प्रशासनाने बंदी घातलेली नाही.

केंद्रिय किटकनाशके मंडळ व नोंदणी समिती, फरिदाबाद यांनी मे.बायर क्रॉप्स सायन्स लि. यांना इथेफॉन ३९% एसएल या किटकनाशकासाठी इथ्रेल या ट्रेड नावाने नोंदणी प्रमाणपत्र प्रदान केले आहे. या नोदणी प्रमाणपत्रामध्ये सदरचे किटकनाशक आंबा व इतर फळ पिकांसाठी वापरण्याकरीता शिफारस केलेली आहे.

(५) राज्यातील बाजार समित्यांमध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळा नाहीत. तथापि, मुंबई, औरंगाबाद, नागपूर या शहरामध्ये प्रयोगशाळा आहेत. त्यामधून तपासणीचे काम केले जाते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नद्यांमध्ये सांडपाणी सोडल्यामुळे होत असलेले प्रदुषण

**(३९) * ११६८२९ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील**

**(अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय जल आयोगाने प्रसिद्ध केलेल्या अहवालात नद्यांमध्ये सांडपाणी सोडल्यामुळे तसेच नदीकिनारी व्यवसायिक बांधकाम करण्याची सवलत दिल्यामुळे पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण घटत असून देशातील नदीतीरांवरील ६५० शहरांपैकी राज्यातील १६१ शहरातील ४९ नद्यांपैकी बाणगंगा, गोदावरी, भीमा, कृष्णा, उल्हास, तापी, गिरणा, पंचगंगा, मीरा, रंगावली, वशिष्टी, आंबा, अमरावती, बिंदुसरा, धारणा, हिवरा, मोर, मोरणा, मुळा, मुठा, पवना, पूर्णा, इंद्रायणी, पंचगंगा इत्यादी नदयांचे पाणी प्रदुषीत होऊन ४५ टक्के जलप्रवांहामधील जलचरांचे आयुष्य धोक्यात आल्याचे दिनांक ११ मे, २०१८ वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोलाड आंबेवाडी (ता.रोहा, जि.रायगड) ग्रामपंचायतीने कच-यासाठी पर्यायी व्यवस्था न केल्यामुळे सदर कचरा गोदा नदीत टाकल्याने व गोदा नदी कुंडलिका नदीला मिळाली असल्यामुळे दोनही नदयांचे पाणी दुषित होवून स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असणे, तसेच पुण्यातील वडगांव शेरी, खराडी, मुंढवा केशवनगर परिसर आणि पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील पिंपरी-काळेवाडी, कंपन्या व वस्त्यांमधील सांडपाणी थेट पवना व इंद्रायणी नदयांमध्ये सोडण्यात येत असणे, दौंड (जि.पुणे) तालुका हद्दीतून गेलेल्या मुळा मुठा व भीमा नदीतील जलपर्णीमुळे प्रदुषण होऊन नदीकाठच्या गावांमध्ये दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव झाला असून, देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील भऊर व परिसरात गिरणा नदीपात्रात मृत जनावरे टाकल्यामुळे दुर्गंधी पसरुन नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे तसेच पिंपळनेर (जि.धुळे, ता.साक्री) येथील पांझरा नदीत ठिकठिकाणी पर्णवेली वाढून शेवाळ तयार

झाल्याचे व नदीपात्रात मृत जनावरे टाकल्यामुळे गाळ साचून पांझरा नदी प्रदूषित झाली असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील १८ हजार किमी एकूण लांबी असणाऱ्या २१८ प्रमुख नद्यांपैकी ८,३१० किमी प्रदूषित नद्यांची लांबी असून नदीकिनारी असलेल्या मुंबई, पुणे, नांदेड, अकोला, नागपूर, सांगली, अमरावती, कल्याण, पनवेल इ. शहरात अधिक प्रदुषण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नद्यांना प्रदूषण मुक्त करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणार या संबंधीची यादी सादर करण्याबाबतचे निर्देश मा.उच्च नायालयाने राज्य शासनाल दिले असल्याने याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे,

(३) हे अंशत: खरे आहे

स्थानिक स्वराज्य संस्थांचे मैलामिश्रीत सांडपाणी अप्रत्यक्षपणे काही प्रमाणात नदीपात्रामध्ये मिसळते.

(४) केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार राज्यातील नदया पुनर्जिवीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत महानगरपालिका व नगरपालिका यांच्या प्रतिनिधींना बोलावून प्रदूषित नदयांच्या पट्टयांची पुनर्स्थापना या विषयावर दि.२५/०४/२०१८ रोजी कार्यशाळा आयोजित केली होती. सदर कार्यशाळेत सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारणे, कार्यान्वीत करणे, योग्य स्तरावर प्रक्रिया करून प्रक्रियायुक्त सांडपाण्याची विल्हेवाट लावणे इत्यादी तसेच अल्प मुदतीचे व दिर्घ मुदतीचे प्रकल्प अहवाल तयार करून अंमलबजावणी करणे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच २७ महानगरपालिका ८६% सांडपाणी निर्माण करतात तर उर्वरित नगरपालिका अंदाजे १४% सांडपाणी निर्माण करतात. सदरच्या अनुषंगाने महानगरपालिकांना भांडवली निधीतून २५% खर्च सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन यासाठी करण्याचे निर्देश दिलेले असून २७ महानगरपालिकांनी नस्ती हमी सुद्धा दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुणगे (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील पुनर्जीवित करण्यात आलेल्या नळ योजनेच्या निकृष्ट कामांबाबत

**(४०) * ११९९१४ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुणगे (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे ९५ लाख रुपये खर्च करून पुनर्जिवित करण्यात आलेल्या नळ योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून सदर नळ पाणीपुरवठा योजना वारंवार बंद पडून नव्या पाईपलाईनला गळती लागल्याने उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील नळ पाणीपुरवठा योजनेच्या ठेकेदार व पोट ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पुनर्जीवित करण्यात आलेली नळ योजना वारंवार बंद पडत असल्याने नळ योजना सुस्थितीत सुरू होईपर्यंत संबंधित ठेकेदारास देयक अदा करण्यात येऊ नये अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित ठेकेदारास देयके अदा न करता काम पूर्ण करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुणगे (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील पुनर्जिवित करण्यात आलेल्या योजनेचे काम अंतिम टप्प्यात असताना योजनेमध्ये काही प्रमाणात गळती असल्याचे निदर्शनास आले.

(२) हे खरे नाही.

योजना वारंवार बंद पडत आहे अशी बाब नाही.

(३) सदर योजनेची दिनांक ०५/०५/२०१८ रोजी प्रत्यक्ष पहाणी केली असता, योजनेमध्ये काही प्रमाणात गळती असल्याचे निदर्शनास आले. योजनेमधील गळती दूर करण्याच्या लेखी सूचना संबंधित ठेकेदारास देण्यात आल्या असून

त्यानुसार गळती दूर करण्याचे काम सुरु आहे. सद्य:स्थितीत योजनेतून पाणी पुरवठा सुरु आहे. योजनेच्या कामापोटी रु.२३,५६,४०१/- व रु.२६,४१,२४३/- अशा दोन हप्त्यांमध्ये अशी एकूण रु.४९,९७,६४४/- इतकी रक्कम ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, मुणगे यांच्याकडे वर्ग करण्यात आली आहे. गळतीचे काम योग्य प्रकारे पूर्ण झाल्यावरच सदर कामाचे देयक अदा करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोरेगांव व कराड तालुक्यातील (जि.सातारा) गावांचा समावेश राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम आराखडा सन २०१७-१८ मध्ये करण्याबाबत

**(४१) * ११८४६५ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील मौजे साप, सुर्ली साठेवाडी, आर्वी, सासुर्वे, बेलेवाडी व कोंबडवाडी (ता.कोरेगाव), मौजे किवळ, करवडी यशवंतनगर,मांगवाडी भांबे धावरवाडी (ता.कराड) व मौजे काशिळ, नागठाणे वेणेगाव कामेरी, तुकाईचीवाडी मत्यापूर (ता.जि.सातारा) या गावांचा राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम आराखडा सन २०१७-१८ मध्ये समाविष्ट करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी, फलोत्पादन आणि पणन राज्यमंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर गावांचा राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम आराखडयामध्ये समाविष्ट करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय. हे खरे आहे.

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सन २०१७-१८ च्या आराखड्यामध्ये सदर गावांचा समावेश केला आहे व सदर आराखडा मंजूर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केळापुर (जि.यवतमाळ) तालुक्यातील आदिवासीबहुल गावांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(४२) * ११९७३८ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात ४९३ लोकवस्त्या व यापैकी केळापुर तालुक्यातील आदिवासीबहुल २५ गावांतील ४१ जलस्रोत हे फ्लोराईडयुक्त असल्याने गावकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२ असल्यास, सदर फ्लोराईडयुक्त पाण्याबाबत नागपूर खंडपीठाने यवतमाळ जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावकऱ्यांना शुद्ध पाणीपुरवठा करण्यास जिल्हा परिषद व पंचायत समिती अपयशी ठरली असल्याने या गावांतील नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा करणे तसेच नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्देशानुसार शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

पाणी नमुने रासायनिक तपासणी अभियान (मान्सूनपूर्व) २०१७-१८ अंतर्गत केळापूर तालुक्याच्या गावातील पिण्याच्या पाण्याच्या एकूण ५८४ स्त्रोताचे पाणी नमुने उपविभागीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा, पांढरकवडा येथे तपासणी करीता प्राप्त झालेले आहेत.

त्यापैकी २५ गावांतील ४१ स्त्रोतांतील पाणी नमुन्यामध्ये फ्लोराईडचे प्रमाण निर्धारित मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे. सदर गावांमध्ये २०१७-१८ या वर्षात कोणत्याही प्रकारची साथरोग व किडनीचे रूग्णही आढळले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) केळापुर तालुक्यातील २५ गावांतील ४१ स्त्रोत बाधित असल्याने सदर पाणी पिण्यास अयोग्य असे फलक लावण्यात आले आहेत.गावातील नागरिकांना १३९ हातपंप, ७५ सार्वजनिक विहीरी,११ विदयुत पंप व २० नळ पाणी पुरवठा योजना इ. शुध्द पिण्याच्या पाण्याचे पर्यायी स्त्रोत उपलब्ध करून सुरळीत पाणी पुरवठा सुरू आहे.

तसेच नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सरकारी अभियोक्ता, नागपूर खंडपीठ यांचेकडून मा.न्यायालयास उत्तर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळमनूरी (जि.हिंगोली) तालुक्यातील बंद नळपाणी योजना सुरु करण्याबाबत

**(४३) * ११८६८२ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनूरी (जि.हिंगोली) तालुक्यात ४०० पेक्षा अधिक हातपंप पाण्याअभावी बंद पडल्याने अनेक गांवामध्ये पाणीटंचाई असून पाण्याची उपलब्धता नसल्यामुळे व तांत्रिक दुरुस्ती अभावी १०४ नळ योजनांपैकी ३६ नळ योजना बंद असणे तसेच औंढा तालुक्यातील २२ तांडयातील ग्रामपंचायत प्रशासनाच्या योग्य नियोजना अभावी ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळमनुरी व औंढा तालुक्यातील पाणीटंचाई दूर करुन बंद असलेल्या नळ पाणी योजना पुवर्वत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) पाणी टंचाई दुर करण्यासाठी टँकरर्सद्वारे, विहीरी व बोअर अधिग्रहण करून, नविन विंधन विहीरी घेऊन तसेच नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती करून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला.

(१) टँकरद्वारे- ४ योजना

(२) विहिर व बोअर अधिग्रहण करून-११ योजना

(३) नविन बोअरवेल घेऊन-३ योजना

(४) नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती-१८ योजना

तसेच औंढा तालुक्यातील २२ तांडयाची पाणी टंचाई दुर करण्यासाठी

(१) टँकरद्वारे- ३

(२) नळ योजनेद्वारे-३ योजना

(३) अधिग्रहणाद्वारे-८ योजना

(४) अस्तित्वातील उपाय योजनोद्वारे-७

(५) नविन विंधन विहीरीद्वारे-१.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शिधापत्रिका संगणकीकृत करताना येत असलेल्या त्रुटींबाबत

**(४४) * ११६६२७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण**

**पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेने स्वस्त धान्य दुकानातून गोरगरीबांना वाटप करावयाच्या धान्यांसाठी पॅनकार्ड, आधारकार्ड, बायोमॅट्रीक अशा हायटेक योजना लागू करुन रेशनकार्ड आधारकार्डला जोडण्याच्या निर्णयामुळे अंदाजे ८० % शिधापत्रिका संगणकीकृत झाल्याने धान्य चोरी रोखणे शक्य झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये शिधापत्रिकांबाबत चुकीची माहिती अपलोड करणे, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे खेड (जि.पुणे) तालुक्यातील दुर्गम, आदिवासी भागातील व इतर जिल्ह्यात ई-पॉस मशीन बंद पडल्याने धान्य वाटण्यास अडचणी निर्माण होत असून उस्मानाबाद

जिल्ह्यात मागील तीन महिन्यांपासून ९० हजार कुटुंबे धान्यापासून वंचित असल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे तसेच नाशिक जिल्ह्यात रेशन दुकानदार व शिधापत्रिका धारकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून गरीब शिधापत्रिका धारकांची आधार नोंदणी पूर्ण करुन त्यांना धान्याचे वाटप करावे असे जिल्हाधिकारी नाशिक यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत शिधापत्रिकेत नावांची नोंद नसणे, नांवे चुकलेली असणे, मशीनला रेंज नसणे, सर्व्हर नादुरुस्त असणे, अनेक ठिकाणी बोटांचे ठसे जुळत नसणे,इ. तक्रारी वाढू लागल्याने दुकानदार व ग्राहक यांच्यात वाद होऊन धान्य वाटप करण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काही ठिकाणी शंभर टक्के इंटरनेट सेवा उपलब्ध नसल्याने पूर्वीप्रमाणे धान्य वितरण करण्याची परवानगी द्यावी अथवा इंटरनेट सेवा उपलब्ध होईपर्यंत पॉस मशीन प्रशासनाने परत घ्यावे अशी मागणी राज्यातील रेशन दुकानदारांनी केली असून नांदेड जिल्ह्यातील दुकानदारांनी केवळ आधारजोडणी धारकांनाच रेशनचे धान्य एका आठवड्यात वाटप करण्याची सक्ती न करता कालावधी वाढवून देण्याची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे निवदेनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात दुकानदार संगणक प्रक्रियेची तांत्रिक कारणे पुढे करून वापर करण्यास टाळाटाळ करीत असणे, कळवा, मुंब्रा व भिवंडी (जि.ठाणे) शहरातील ३७ एफच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने व शिधावाटप कार्यालयामध्ये दलालांचा ताबा असून शिधावाटपामध्ये त्रुटी असल्याचे सांगून नागरीकांना त्रास देणे तसेच मुंबई, धारावी येथील शिधावाटप केंद्रातील बायोमेट्रिक मशीनचे नेटवर्क गायब झाल्याने एम.जि. रोडवरील सोशलनगर सोसायटी १७ अ ४४ शिधावाटप केंद्र येथे नागरिकांना धान्य मिळत नसणे, खेड (जि.पुणे) तालुक्यातील दुर्गम, डोंगरी, आदिवासी भागातील गोरगरीबांना शिधावाटप दुकानातून धान्याचे वाटप करण्यात अडचणी निर्माण झाल्याने अनेक गोरगरीब स्वस्त धान्यापासून वंचित असणे, भुसावळ तालुक्यातील आधार लिंक न केल्याने १२ हजार शिधापत्रिकाधारकांना बायोमॅट्रीक पध्दतीने धान्य वितरण करण्यात न येणे तसेच नाशिक जिल्ह्यात पॉस मशिनव्दारे ७० टक्के धान्य

वितरण केलेले असून १ लाख शिधापत्रिकाधारकांची ओळख पटत नसल्याने जुन्या पध्दतीनुसार धान्यवाटप करण्याची मुभा दिली असताना ७४ रेशन दुकानदारांनी नियमित पध्दतीने धान्य वाटप केल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील स्वस्त धान्य दुकानदार व रॉकेल विक्रेते यांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान विधीमंडळावर मोर्चा काढला होता तसेच ठाणे जिल्हयातील १४७३ शिधावाटप दुकानदारांनी दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी पासून संप पुकारला होता, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) ई पॉस मशीनद्वारे धान्यवाटप करताना पात्र लाभार्थी अनुदानित अन्नधान्यापासून वंचित राहू नये यास्तव करावयाच्या उपाययोजना दि.२ फेब्रुवारी, २०१८ व दि. १२ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रांन्वये मुंबईसह सर्व क्षेत्रीय अधिका-यांना कळविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सर्व जिल्हयांत ई पॉस मशीनमध्ये तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास त्याचे वेळीच निराकरण केले जाते.

उस्मानाबाद जिल्हयामध्ये कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहिल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

नाशिक जिल्हयात संघटनांनी जिल्हाधिकारी नाशिक यांना लेखी निवेदन दिले असून सर्व पात्र लाभार्थ्यांना उपरोक्त नमूद शासन पत्रांन्वये दिलेल्या सूचनांनुसार अन्नधान्याचे वितरण केले जात आहे.

(४) काही ठिकाणी शंभर टक्के इंटरनेट सेवा उपलब्ध नसल्याने पूर्वीप्रमाणे धान्य वितरण करण्याची परवानगी देण्याच्या मागण्या करण्यात आलेल्या आहेत.

नांदेड जिल्हयामध्ये धान्यवाटप कालावधी वाढवून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) ई पॉस मशीनमध्ये येणा-या तात्कालिक अडचणींचे तातडीने निराकरण करून धान्यवितरण सुरळीत करण्यात येत असून पात्र लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित ठेवण्यात आलेले नाही. धान्य वाटपाबाबत नाशिक जिल्हयात कोणत्याही रास्तभाव दुकानदारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(६) राज्यातील स्वस्त धान्य दुकानदार व रॉकेल विक्रेते यांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी माहे मार्च, २०१८ मध्ये विधीमंडळावर मोर्चा काढला होता तथापि ठाणे जिल्हयामध्ये संप पुकारल्याची बाब आढळून आलेली नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खाडीकिनारी असलेल्या गावांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(४५) * ११७७३१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खाडीकिनारी असलेल्या १५ ते २० गावांतील विहिरींचे उद्भव फेब्रुवारी अखेरीस कोरडे पडतात आणि भरती-ओहोटीमुळे कोरडया पडलेल्या उद्भवांमध्ये खाडीतील गढूळ व खारट पाणी जात असल्याने हे पाणी पिण्यायोग्य नसल्याने उन्हाळयात पाणी टंचाई निर्माण होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाडी भागातील गावांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या उपस्थितीत मंत्रालय, मुंबई येथे बैठक घेण्यात येऊन सदर बैठकीत खाडी भागातील कर्जी गावच्या हद्दीत असलेल्या धरणातील गाळ काढण्यासाठी शासनाच्या गाळमुक्त धरण योजनेतून तसेच उद्भव दूषित असणाऱ्या विहिरींतील योजना आणि अन्य योजनांसाठी तात्काळ निधी देण्याचे मा. मंत्री महोदयांनी मान्य केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त योजनांसाठी निधी उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

पाणी तपासणी अहवालानुसार खेड तालुक्यातील तीन गावातील पिण्याचे पाणी पिण्यायोग्य नसल्याचे आढळून आले.

(२) शासनाच्या गाळ मुक्त धरण योजनेतून कर्जी नळ पाणी पुरवठा योजनेच्या धरणातून गाळ काढणेकरिता ग्रामपंचायती कडून तसा प्रस्ताव घेवून मंजुरीसाठी सादर केल्या नंतर निधी देण्याचे मा. मंत्री महोदय यांनी मान्य केले होते.

(३) गाळ मुक्त धरण गाळ युक्त शिवार या योजने अंतर्गत कर्जी नळ पाणी पुरवठा योजनेच्या धरणातील गाळ काढणे बाबत सुचना केल्याप्रमाणे जिल्हा परिषद, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग रत्नागिरी यांचेकडून या कामा करिता रु. २२,४७,६००/- एवढया खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यानुषंगाने जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी दि. १५/०१/२०१८ च्या पत्रान्वये ग्रामपंचायत कर्जी यांना सदर गाळ जमा करुन वाहून नेणे व त्याचा शेतात वापर करणे याबाबत शेतकरी/ग्रामपंचायतीने मागणी करावी असे कळविले होते. तथापि, ग्रामपंचायतीने असा मागणी प्रस्ताव अद्याप जिल्हा परिषदेला दिलेला नाही. त्यामुळे सदर कामास अद्याप मंजूरी देता आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात औषधांचा दर्जा तपासून मानांकनानुसार गुणवत्ता नसलेल्या औषधांची झालेली विक्री

**(४६) * ११७८४८ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न व औषधांच्या दर्जाची तपासणी करुन मानांकनानुसार गुणवत्ता नसलेल्या औषधांचा साठा परत घेण्यास विलंब झाल्याने रुग्णांनी अशा औषधांचे सेवन केल्याचा अहवाल भारताचे नियंत्रक व महालेखापाल (कॅग) यांनी दिल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तपासणी केलेल्या ३७५ प्रकरणांपैकी ९५ प्रकरणात आणि मानांकनानुसार गुणवत्ता पातळी नसलेल्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक औषधांचा

साठा परत घेण्यापूर्वी ६१ प्रकरणात गुणवत्ता पातळी नसलेली औषधे विकली गेल्याचे कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) होय.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील गोदावरी बायोरिफायनरीज कारखान्यातील प्रदुषणामुळे नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबत

**(४७) * ११७६७२ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील गोदावरी बायोरिफायनरीज कारखान्यातून निघणारा ज्वलनशिल पदार्थ, विषारी वायू व कोळशाची राख यामुळे नागरीकांना विविध प्रकारचे श्वसनाचे आजार, डोळयांची जळजळ इ. आजारांची लागण झाली असल्याचे तसेच जमीनी नापीक व विहिरीचे पाणी दुषीत होऊन लालसर झाल्याचेही माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही, तथापि एप्रिल, २०१८ या महिन्यात कंपनीमुळे जल व वायू प्रदुषणाबाबतची श्री.टेके व इतर स्थानिक तक्रारदार यांची तक्रार प्राप्त झाली होती, हे खरे आहे.

(२) श्री.टेके व इतर स्थानिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने म.प्र.नि.मंडळाने श्री.इंद्रकुमार झा, आय.आय.टी., मुंबई या तांत्रिक तज्ञांच्या समवेत असलेल्या समितीने दि १७/०४/२०१८ रोजी कारखान्याची व शेजारील विहिरींची तपासणी करून एकूण १४ पाण्याचे नमुने संकलित केले आहेत.

सदर उद्योगाच्या तपासणी दरम्यान उद्योगाच्या औद्योगिक व घरगुती सांडपाण्याचे नमूने विहित मानकांच्या मर्यादेपेक्षा जास्त असल्याने प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांनी सदर उद्योगास दिनांक १८.६.२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच तांत्रिक समितीचा अहवाल प्राप्त होताच त्यावर नियमानुसार आवश्यकती कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ५१ किल्ल्यांवर शौचालय उभारण्याबाबत

**(४८) * ११६७७४ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पुरातत्व विभागाने माहितीच्या अधिकारात दिलेल्या माहितीवरुन राज्य शासनाच्या अखत्यारीत असणाऱ्या राज्यातील ५१ किल्ल्यांवर एकही शौचालय नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गड/किल्ल्यांचे पावित्र्य राखण्याच्या दृष्टीने सेवाभावी संस्था, पुणे आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रातील गड किल्ल्यांवर स्वच्छतागृह बांधण्यासाठी संस्थेने लोकवर्गणीतून उभ्या केलेल्या निधीमधून शौचालये बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार किल्ल्यांवर शौचालय उभारणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२)  व (३) महाराष्ट्रातील गड किल्ल्यांवर स्वच्छतागृह बांधण्यासाठी सस्थेने लोकवर्गणीतून उभ्या केलेल्या निधीमधून शौचालय बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

**(४९) * ११८५५४ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील संभाव्य पाणीटंचाई निवारणाचा कृती आराखडा मंजूर होऊन माहे, मार्च पर्यतंचा या आराखडयाचा पहिला टप्पा संपला असतानाही विहीरी व विंधन विहीरी अधिग्रहीत न केल्यामुळे येथील ग्रामस्थांची पाण्यासाठी भटकंती सुरु असल्याचे दिनांक २५ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने येथील विहिरी व विंधनविहीरी अधिग्रहीत करुन ग्रामस्थांना तातडीने पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) कंधार तालुक्यात माहे मार्च, २०१८ अखेर ५ विंधन विहीरीद्वारे ४ गावे व १ वाडी तांडयांना पाणी पुरवठा करण्यात आला होता. सध्या कंधार तालुक्यात १३ विहीरी व ६२ विंधन विहीरी असे एकूण ७५ विहीरी / विंधन विहीरीद्वारे ४० गावे व १८ वाडी तांडयानां पाणी पुरवठा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयात नवीन बीपीएल कार्डधारकांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(५०) * १२१५१७ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.वैभव पिचड**

**(अकोले) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात अंत्योदय, बीपीएल कार्ड धारकांना गहू व तांदूळ रुपये २ किलो दराने व अंत्योदय लाभार्थ्यांना प्रति कार्ड ३५ किलो धान्य वाटप करण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत कार्डधारकांना तेल, साखर, डाळ इत्यादी वस्तु देण्यात येत होत्या परंतु मागील काही वर्षापासून नविन रेशन कार्ड धारकांनी नविन रेशन कार्ड तयार करुनही त्यांना सदर योजनेचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुंटुबांत एक किंवा दोन लाभार्थी असलेल्या कुटुबांना अंत्योदय मधून वगळुन प्राधान्य कुंटुंब लाभार्थ्यांमध्ये समावेश केल्याने गरीब व दुर्बल घटकातील नागरीकांच्या रेशनवरील धान्य कोट्यात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार अंत्योदय अन्न योजनेखालील सर्व लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका ३५ किलो व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो याप्रमाणात ३/- प्रतिकिलो या दराने तांदूळ, २/- प्रतिकिलो या दराने गहू देण्यात येत आहे.

(२) अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांना प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका १ किलो साखर देण्यात येत असून, सर्व प्रकारच्या शिधापत्रिकाधारकांना ३५/- प्रतिकिलो दराने मागणीनुसार तूरडाळ देण्यात येत आहे.

शासन निर्णय दिनांक २१/०५/२०१८ अन्वये नवीन लाभार्थ्यांची निवड करताना दिनांक ३० एप्रिल, २०१८ पर्यंतच्या शिधापत्रिकांचा समावेश करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. निवड प्रक्रिया सुरु असून, आवश्यकतेनुसार जिल्हानिहाय इष्टांक सुधारीत करुन देण्यात येत आहे.

(३) व (४) अंत्योदय अन्न योजनेमधील एक किंवा दोन सदस्य असलेल्या शिधापत्रिकांबाबत भंडारा जिल्ह्यात अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षेमध्ये गुण वाढवून दिल्याची ध्यनीफित प्रसार माध्यमांवर प्रसारित झाल्याबाबत

**(५१) * ११६८५३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षेमध्ये गुण वाढवून देण्याचे रॅकेट सोशल मिडियावर कार्यरत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी दिनांक १२ ते २१ डिसेंबर, २०१७ च्या दरम्यान १ लाख ७१ हजार ३४८ उमेदवारांनी चाचणी परिक्षा दिली असून सदर चाचणी परिक्षा ई-महा परिक्षा पोर्टलच्या माध्यमातून संपूर्ण संगणकीय प्रणालीच्या आधारे घेण्यात येऊन त्याचा निकाल परिक्षा झाल्याबरोबर समजला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिक्षेचा निकाल ऑनलाईन पध्दतीने माहे जानेवारी, २०१८ मध्ये जाहिर केला त्यावेळी सदर निकालात आणि परिक्षा झाल्यावर दाखवलेल्या गुणांमध्ये १ ते २० गुणांमध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आल्याने विद्यार्थ्यांनी याबाबत घेतलेल्या आक्षेपानुसार निकालाची हार्डकॉपी अद्याप परिक्षार्थींना मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची ध्वनीफित समाजमाध्यमांवर प्रसारित झाली असून सदर ध्वनीफितीमध्ये अनेक राजकीय नेते तसेच शिक्षण खात्यामधील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा उल्लेख केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक १२ ते २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या शिक्षक भरतीच्या चाचणी बाबत शासन पुनर्विचार करणार आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) सदर परीक्षेतील काही प्रश्नांबाबत विद्यार्थ्यांकडून आक्षेप घेण्यात आल्यामुळे सदर प्रश्नाबाबत सामान्य (Normalization) पध्दतीने गुण मोजण्याचा (Calculation) निर्णय घेण्यात आला. त्यामुळे प्रत्यक्ष परीक्षा संपल्यावर संगणकावर दाखविण्यात आलेले गुण व प्रत्यक्ष निकालाद्वारे मिळालेले गुण याच्यामध्ये फरक दिसतो.

(४), (५) व (६) अशा प्रकारची ध्वनीफित समाजमाध्यमांवर प्रसारित झालेली असल्याचे आढळते. याबाबत बंडगार्डन पोलीस ठाणे पुणे येथे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

-----------------

## मुंबई येथील अंधेरी, साकीनाका व विलेपार्ले येथे बनावट सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केल्याबाबत

**(५२) * ११८९५१ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अंधेरी, साकीनाका व विलेपार्ले येथे अन्न व औषध प्रशासनाच्या औषधी विभागाच्या गुप्तवार्ता शाखेने गोपनीय माहितीवरुन दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास एकाचवेळी तीन छापे टाकून रुपये दीड कोटींचा बनावट सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एफडीएच्या अधिका-यांनी टाकलेल्या छाप्यात अंधेरी (पुर्व) येथील साईबाबा मंदिर जवळ यमुनाबाई चाळीतील एका खोलीत लॉरीअलच्या शॉपू-कंडिशनरच्या रिकाम्या वापरलेल्या कंटेनरर्स मध्ये अवैधरित्या तयार

केलेला शाम्पू कंडिशनर विना परवाना भरला जात असल्याचे तसेच मे. बायो कॉसमॅक्टीक्स अंधेरी (प) येथे बनावट शॉम्पू कंडिशनर माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे ही खरे आहे काय.

(३) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींना अटक करुन त्यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई येथील अंधेरी, साकीनाका व विलेपार्ले येथे अन्न व औषध प्रशासनाने गोपनीय माहितीवरुन दि.०४ मे, २०१८ रोजी तीन छापे टाकून अंदाजे ४ लाख ७० हजार रुपयांचा बनावट सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केला आहे.

तसेच दि.०५ मे, २०१८ रोजी विलेपार्ले येथे छापा टाकून अंदाजे ४ लाख ८८ हजार रुपयांचा बनावट सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी साकीनाका पोलिस स्टेशन येथे दि.१४/०५/२०१८ रोजी संबधिताविरुध्द प्रथम खबर अहवाल नोंदविला असून गुन्हा क्र.३०७/१८ आहे तसेच अंबोली पोलिस स्टेशन येथे दि.१४/०५/२०१८ रोजी संबधिताविरुध्द प्रथम खबर अहवाल नोंदविला असून गुन्हा क्र.२४४/१८ आहे. सदर प्रकरणी पोलिसांकडुन पुढील तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.